दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक

सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2021-2023
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

नोंदणी क्र.एमएलव्ही/२१/०९ रजिस्ट्रेशन क्र. ४३७११/८५ ● गुरूवार दि.८ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● वर्ष ३९ ● अंक ९८ ● किंमत ३ रू ● सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, रायगड, गोवा, पुणे

# अरुणा धरणाच्या कालव्याचे काम बंद; आंदोलन सलग तिसऱ्या दिवशीही सुरु

### अरुणा धरणाचे प्रकल्प अधिकारी राजन डवरी विरोधात ४२ प्रकल्पग्रस्तांच्या तक्रारी..

अरुणा मध्यम पाटबंधारे प्रकल्पग्रस्तांपैकी आखवणे येथील १६५ प्रकल्पग्रस्तांचे हेत किंजळीचा माळ येथे शासनाने पुनर्वसन केले आहे; मात्र तेथे पुनर्वसनाच्या अनुषंगाने कोणतीही कामे गेल्या ५ वर्षांत केलेली नाहीत. पुनर्वसन गावठाणासाठी स्वतंत्र विहीर खोदण्याचे आश्वासन पाटबंधारे विभागाकडून देण्यात आले आहे; मात्र यावरही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नाही. नळपाणी पुरवठा योजनेत वारंवार होणार्या बिघाडामुळे धरणग्रस्तांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. गेले ८ दिवस पुनर्वसन गावठाणातील नळयोजनेला पाणी आलेले नाही. पात्र लाभार्थ्यांना अद्याप भूखंड मिळालेले नाहीत, अशा अनेक मागण्या आहेत; मात्र त्यावर अद्याप कोणतीच कार्यवाही नाही, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. 'जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण केल्या जात नाहीत, तोपर्यंत धरणाचे काम करू देणार नाही', अशी चेतावणी धरणग्रस्तांनी दिली आहे.

अरुणा मध्यम प्रकल्प धरण प्रकल्प केंद्र सरकारच्या पंतप्रधान सिंचन योजनेत असून धरणाचे व कालव्याचे काम वेळेत पूर्ण करण्याचे शासनाचे उदिष्ट असल्याचे सांगितले जात आहे. मात्र एकीकडे धरणाचे व कालव्याचे काम युध्द पातळीवर करण्यात येत आहेत. मात्र या धरणासाठी स्वतःचे गाव, घरदार व सर्वस्वाचा त्याग केला आहे. त्या धरणग्रस्तांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे धरणग्रस्तांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे.





**वैभववाडी । प्रतिनिधी**

अरुणा धरणाच्या कालव्याचे काम बंद आंदोलन सलग तिसऱ्या दिवशीही सुरु आहे. जोपर्यंत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केले जात नाही आणि प्रशासनाकडून दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली जात नाही, तोपर्यंत येथे काम करू देणार नाही, असे सांगत संतप्त झालेल्या अरुणा प्रकल्पग्रस्तांनी ५ फेब्रुवारी पासून येथे चालू केलेले अरुणा धरणाच्या कालव्याचे आणि अन्य कामे बंद पाडली. धरणग्रस्त प्रकल्पस्थळी ठाण मांडून बसले असून प्राधान्यांने पाण्याचा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत काम बंद आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्धार धरणग्रस्तांनी केला आहे. हेत किंजळीचा माळ पुनर्वसन गावठाणातील पाणी प्रश्न व अन्य समस्यांकडे वारंवार लक्षवेधूनही पाटबंधारे विभागाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करीत सोमवारपासून येथील धरणग्रस्तांनी प्रकल्पस्थळी जाऊन काम बंद पाडले आहे. बुधवारी सलग तिसऱ्या दिवशी धरणग्रस्त प्रकल्पस्थळी ठाण मांडूण बसले आहेत. कालवे व संबंधित काम पूर्णपणे बंद आहे. दरम्यान मंगळवारी दुपारी पाटबंधारे विभागाचे उपअभियंता श्री.मगरे यांनी प्रकल्पस्थळी भेट देऊन चर्चा केली. यावेळी धरणग्रस्तांना श्री.मगरे यांनी अपशब्द वापरल्याचा आरोप धरणग्रस्तांनी केला. यावेळी अधिकारी व धरणग्रस्तां मध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. मात्र त्यांच्याकडून पाण्या संदर्भात कोणतेही ठोस आश्वासन मिळाले नाही.त्यामुळे धरणग्रस्त काम बंद आंदोलनावर ठाम आहेत. हेत किंजळीचा माळ येथील पुनर्वसन गावठाणासाठी हेत बांबर **पान ३ वर...**

## थोडक्यात



### वडाचापाटच्या स्वयंभू शांतादुर्गा माऊलीचा वार्षिक जत्रोत्सव उत्साहात संपन्न!

**मालवण । वार्ताहर**

नवसाला पावणारी व हाकेला धावणारी अशी ख्याती असलेल्या वडाचापाट येथील आई स्वयंभू शांतादुर्गा माऊलीचा वार्षिक जत्रोत्सव हजारो भाविकांच्या उपस्थितीत २५ ते २९ जानेवारी या कालावधीत संपन्न झाला. श्री शांतादुर्गा माऊलीच्या नामाचा जयघोष करीत आई माऊलीचे भरजरी वस्त्रालंकार घालून नटलेले ते भव्य दिव्य, प्रसन्न असे रूप पाहून हजारो भाविक आईच्या चरणी नतमस्तक झाले. भाविकांनी नवस फेडण्यासाठी, ओटी भरण्यासाठी रांगा लावल्याचे दिसून आले. पाच दिवस विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रम,शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमां बरोबर सतत पाच दिवस महाप्रसाद आयोजित करण्यात आला होता. देवीच्या हजारो भक्तांच्या सहकार्याने सर्व कार्यक्रम चांगल्या प्रकारे पार पडले.



### तहसीलदार आर.जे .पवार यांची मुंबई अंधेरीत बदली !

**देवगड । पांडूशेठ साटम**

देवगडचे तहसीलदार आर. जे. पवार यांची प्रशासकीय बदली झाली असून. मुंबई अंधेरी येथील संजय गांधी योजना तहसीलदारपदी त्यांची नियुक्ती झाली आहे. तहसीलदार आर.जे.पवार यांची बदली प्रशासकीय आहे. चार वर्षे त्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये काम केले. आणि तीन वर्षे कणकवली मध्ये तहसीलदार म्हणून त्यांनी काम केले. त्यांच्या चांगल्या कामाबद्दल सत्कार देखील करण्यात आला. प्रशासकीय कामकाजामध्ये त्यांनी लोकांना सोबत घेऊन चांगले काम केले होते.

### रेल्वे अपघातात महिलेचा मृत्यू

**ओरोस । वार्ताहर**

रानबांबुळी-अणावकर वाडी येथील रेल्वे ब्रीजवर एक वृद्ध महिला मालगाडीखाली आल्याने तिचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला असून ओळख पटविण्यासाठी संबंधितांनी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. रात्री १०.१५ वाजण्याच्या सुमारास चेतक ही रोरो मालगाडी गोव्याच्या दिशेने जाते. ५ फेब्रुवारी रोजी रात्री सिंधुदुर्गनगरी रेल्वे स्थानक ते कसाल या दरम्यानच्या रानबांबुळी- अणावकरवाडी येथील ब्रीजवर रेल्वे रुळ ओलांडणाऱ्या एका महिलेला या गाडीची धडक बसली. यात ती मरण पावली.

सिंधुदुर्ग समाचार

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या, अडचणी थेट वाचकांपर्यंत पोहचविण्यात येतील आणि त्याला नावासहित प्रसिद्ध दिली जाईल. लेख, कथा, कविता sindhudurg. samachar@gmail. com या ईमेल वर पाठवू शकता. तसेच सिंधुदुर्ग समाचारचा अंक सुरू करण्यासाठी, व जाहीराती, बातम्यांसाठी संपर्क ९८२२९७९७३२. kdrupa@gmail.com**

## रोणापाल ग्रामस्थांचे ग्रामपंचायत विरोधात उपोषण



**बांदा । वार्ताहर**

रोणापाल श्री देवी माऊली मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे, सार्वजनिक स्वच्छतागृह व्यवस्था करणे, हायमास्ट बसविणे व ग्रामीण तीर्थक्षेत्रांना 'क' वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा देणे याविषयीच्या प्रस्तावाबाबत रोणापाल ग्राम पंचायत प्रशासन सहकार्य करत नाही. त्यामुळे येत्या १५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा. रोणापाल ग्रामपंचायत कार्यालय येथे उपोषणास बसणार असल्याचा इशारा माजी सरपंच तथा देवस्थान मानकरी प्रकाश गावडे तसेच ग्रामस्थांनी दिला. यासंदर्भात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.यावेळी शिवसेना (शिंदे) इन्सुली विभागप्रमुख राजन परब, ग्रामपंचायत सदस्य नंदू नेमण, शिवसेना (ठाकरे) शाखा प्रमुख मंगेश गावडे, सामाजिक कार्यकर्ते सुदिन गावडे, माजी तंटामुक्ती समिती अध्यक्ष बाबल तूयेकर, देवस्थान मानकरी न्हानू गावडे व निलेश नाईक उपस्थित होते. माजी सरपंच प्रकाश गावडे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, विकास कामांसंदर्भातील प्रस्तावाबाबत ग्रामपंचायत प्रशासनाकडे अनेक वेळा मागणी केली. परंतु सकारात्मक उत्तर मिळाले नाही. माऊली मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे, सार्वजनिक स्वच्छतागृह व्यवस्था **पान ३ वर...**

## कसई – दोडामार्ग न.पं.च्या प्रारूप विकास आराखड्यात नेमकं दडलंय काय ?

**दोडामार्ग । वार्ताहर**

कसई-दोडामार्ग नगरपंचायतच्या नगररचना विभाग सिंधुदुर्ग यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रारूप विकास आराखड्यास मंजुरी सभेपासून पत्रकारांना नगरपंचायत ने निमंत्रित करून बाजूला ठेवल्याने ही गोपनीयता नेमकी कशासाठी असा प्रश्न निर्माण झाला आहे. आणि जर पत्रकारांना सभेत सहभागी करून घ्यायचेच नव्हते तर निमंत्रित तरी का करण्यात आले असा सवाल पत्रकारांतून उपस्थित करणेत आला आहे. सभा घेण्यासाठी आलेले नगररचना विभागाचे संचालक विद्याधर देसाई यांनीही पत्रकारांच्या कोणत्याच प्रश्नाला उत्तर न देता सभा संपताच तेथून काढता पाय घेतल्याने शहर विकासाच्या प्रारूप आराखड्यात नेमकं दडलंय तरी काय असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

ग्रामपंचायतचे कसई-दोडामार्ग नगरपंचायतमध्ये वर्गीकरण झाले नंतर दोडामार्ग ला शहरीकरणाचे वारे वाहू लागले आहे. दोडामार्ग शहरात अलीकडच्या काळात अनेक मोठ-मोठ्या निवासी इमारती, शॉपिंग कॉम्प्लेक्स, छोटे-मोठे उद्योग धंदे, व्यापारी संकुले वगैरे वेगाने उभ्या राहत आहेत. साहजिकच त्यामुळे शहरातील लोकसंख्या देखील वाढीस लागली आहे. त्या पार्श्वभूमीवर आरोग्य, पाणी, शिक्षण, दळणवळण, इमारत व्यवस्थापन, स्वच्छता, निवारा, कचरा, सांडपाणी आदींचेही नियोजन करणे सुरू झाले आहे. नगरपंचायत तर्फे गेल्या काही वर्षांपासून या संदर्भात आपल्या परीने नियोजन केले जात आहे. मात्र आता या शहराला प्रारूप देण्यासाठी व शहर नियोजन बद्ध वासण्यासाठी जिल्हा प्रशासनातील नगर रचना विभाग देखील याठिकाणी कार्यरत झाला आहे. त्या अनुषंगाने कसाई दोडामार्ग नगरपंचायत शहरांचा म्हणजे नगरपंचायत चा प्रारूप विकास आराखडा बनविला गेला आहे. काही दिवसांपापूर्वी झालेल्या बैठकी नंतर पुन्हा मंगळवारी नगररचना विभाग (टाऊन प्लॅनिंग) व नगरपंचायत या दोहोंची त्याच प्रारूप विकास आराखड्याला चर्चा करून मंजुरी देणेसाठी संयुक्त बैठक येथील बाजारपेठेतील पिंपळेश्वर सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला स्वतः **पान ३ वर...**

## दोडामार्ग बांधकाम विभाग कडून तालुक्यातील रस्ते अखेर गुळगुळीत



**दोडामार्ग । वार्ताहर**

सार्वजनिक बांधकाम विभाग दोडामार्ग यांच्या ताब्यात असलेले दोडामार्ग तालुक्यातील तसेच दोडामार्ग शहरातील रस्ते डांबरीकरण करण ते गुळगुळीत करायला सुरुवात केली आहे. त्यामुळे गेल्या दोन वर्षात काही रस्ते वगळता दोडामार्ग ते बांदा दोडामार्ग ते विजघर, दोडामार्ग ते पणजी ही कामे पूर्ण झाली आहेत. दोडामार्ग बस स्थानकापासून सुरुची वाडी बांधकाम कार्यालय तसेच लोकवस्ती दरम्यान जाणारा रस्ता बांधकाम विभाग यांनी पूर्ण केला आहे. माटणे ते आयी दरम्यान काही रस्ता गॅस पाईप लाईन मुळे थांबला होता ते एक दिड महिन्यात पूर्ण केला जाणार आहे.शाखा अभियंता अनिल बडे सहायक शाखा अभियंता संभाजी घंटे यांच्या प्रयत्नामुळे दोडामार्ग तालुक्यातील रस्ते पुन्हा एकदा चकाचक झाले आहेत. बांधकाम विभाग यांच्या कामगिरी बद्दल आता समाधान व्यक्त केले जात आहे.

## राजापूर येथे शिंपल्यांची तस्करी करणाऱ्या टेंपोसह चालक ताब्यात




**राजापूर । प्रतिनिधी**

राजापूर तालुक्यातील साखर कोंभे येथे शिम्पल्यांची तस्करी करणारा टेम्पो पोलिसांनी सापळा रचत पकडला. साखर कोंभे येथून हा ट्रक कोल्हापूरच्या दिशेने निघाला होता. या बाबतची माहिती मिळताच राजापूर पोलिसांनी टेंपोसह चालकाला ताब्यात घेतले.

५ फेब्रुवारी रोजी रात्री अकरा वाजण्याच्या दरम्यान ही कारवाई करण्यात आली. राजापूर पोलीस ठाणे येथे गोपनीय कामकाज करणारे पोलीस अंमलदार सचिन वीर यांना याबाबत गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. राजापूर तालुक्यातील 'साखर कोंभे या ठिकाणाहून शिंपल्यांची कच भरलेला एक आयशर टेम्पो गैरकायदा विनापरवाना वाहतूक करत असल्याची माहिती प्राप्त झाली होती. माहिती मिळताच लागलीच राजापूर पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. फुलचंद मेंगडे यांना याबाबत कळविण्यात आले. त्यांनी राजापूर पोलीस ठाणे हद्दी मधील हातिवले येथे या गैरकायदा विनापरवाना शिंपल्यांची कच वाहतूक करत असलेल्या आयशर टेम्पोला पकडण्याकरिता एक पथक नेमले.

हातिवले येथील मुंबई- गोवा महामार्गावर या पथकाला गस्त घालत असताना रात्री अकरा वाजण्याच्या दरम्याने हातिवले, जोशी पेट्रोलपंप समोरील महा मार्गावर एक लाल रंगाचा आयशर **पान ३ वर...**

## भ्रष्ट तलाठ्याला वैभव नाईक यांचा दणका ! तडकाफडकी बदली

**कणकवली । वार्ताहर**

आमदार वैभव नाईक यांनी राज्य शासनाचे महसूल विभागाचे सचिव राजगोपाल देवरा यांच्याकडे केलेल्या तक्रारीनुसार शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ च्या तरतुदीअंतर्गत कुडाळ तालुक्यातील वालावल सजाचे तलाठी किरण सुधाकर सोनवणे यांची गोठोस तलाठी सजा येथे तडकाफडकी बदली करण्यात आली आहे.

किरण सोनवणे हे तलाठी ३ वर्षे चेंदवण वाळू टप्प्यात काम करीत होते. प्रशासकीय बदलीच्या वेळी त्यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून पुन्हा वालावल वाळू टप्प्यात बदली करून घेतली. वालावल व चेंदवण या दोन तलाठी सजा एकमेकांना लागून आहेत आणि या दोन्ही सजांच्या कार्यक्षेत्रात वाळू उत्खनन होत असते. सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासनाच्या नियमानुसार लिलाव पद्धतीने वाळू उत्खनन केले जाते. मात्र तलाठी किरण सोनवणे हे गेली अनेक वर्षे अनधिकृत वाळू उत्खननास सहकार्य करून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करत असल्याच्या अनेक तक्रारी स्थानिक ग्रामस्थांच्या येत होत्या. त्याचबरोबर सर्वसामान्य **पान ३ वर...**

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या आवाहनानुसार राज्यातील निवासी डॉक्टरांनी प्रस्तावित संप घेतला मागे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात १० हजार रुपयांची भरीव वाढ करण्यासह त्यांचे विद्यावेतन प्रत्येक महिन्याच्या ठराविक तारखेला नियमितपणे देण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी आज दिली. निवासी डॉक्टरांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या असून आपला प्रस्तावित संप मागे घेण्याचे आवाहन उपमुख्यमंत्र्यांनी केले. या आवाहनाला प्रतिसाद देऊन सेंट्रल मार्ड संघटनेने आपला प्रस्तावित संप मागे घेतला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या दालनात सेंट्रल मार्ड संघटनेच्या मागण्यांसंदर्भात बैठक झाली. बैठकीस वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, तसेच सेंट्रल मार्ड संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न वसतिगृहांच्या तक्रारींसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, निवासी डॉक्टरांच्या वसतिगृहांची दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने वसतिगृहांच्या दुरुस्तीची कामे तातडीने हाती घ्यावीत. विविध जिल्ह्यांत मंजूर करण्यात आलेल्या वसतिगृहांच्या बांधकामांना गती देण्यात यावी. शासनाने नवीन वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करताना त्याच्या आराखड्यात वसतिगृहाचा समावेश केला आहे. त्यामुळे नवीन **पान ३ वर...**

## 'पंतप्रधान' देशाचा असतो, पक्षाचा नाही'; शरद पवारांचा दिल्लीतून



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज संसदेच्या सभागृहात भाषण करताना काँग्रेसवर जोरदार टीका केली. पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात देशाचे माजी पंतप्रधान दिवंगत जवाहरलाल नेहरू यांच्या काही वक्तव्यांचा उल्लेख करत त्यांच्यावरही निशाणा साधला. नरेंद्र मोदी यांच्या याच भाषणावर नाराजी व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी अध्यक्ष शरद पवार यांनी मोदींना लक्ष्य केलं आहे. नवी दिल्ली येथे एका कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांशी संवाद साधताना शरद पवार म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं संसदेतील भाषण ऐकून दु:ख झालं. कारण पंतप्रधान हा संपूर्ण देशाचा असतो, तो एका पक्षाचा नसतो. मात्र त्यांनी आज आपल्या भाषणात देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरूपली;यांच्यावर टीका केली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या नेत्यांनी आपला उमेदीचा काळ तुरुंगात घालवला, त्या नेत्यांमध्ये जवाहरलाल नेहरू यांचाही समावेश होता. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचा चेहरा बदलण्यासाठी, जगात देशाची प्रतिमा बदलण्याठी ज्यांनी काम **पान ३ वर...**

सिंधुदुर्ग समाचार

।। बुडती हे जण न देखवे डोळा! ।।

# भाजपसाठी सत्ता हेच लोकतंत्र !

सत्ताधाऱ्यांनीच लोकशाहीची थट्टा चालवली आहे की काय असा प्रश्न पडतो. आपली सत्ता ज्या राज्यात नाही तिथे पुढील वेळी आपली सत्ता येण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे यात गैर असे काही नाही पण जिथे निवडणूक नसतानाही वर्तमान सत्ता उलथवून टाकत स्वत: तिथे दिमाखात बसणे गैर आहे. त्यासाठी होणाऱ्या राजकीय तडजोडी, वाटाघाटी यातून जनतेला हाच स्पष्ट संदेश आहे की, तुमचे काम केवळ मतदान करणे हेच आहे. जर तुम्ही यावेळी आम्हाला नाकारले आणि दुसऱ्या कोणाला स्वीकारले तर आगामी कालावधीत केव्हाही आम्ही त्यांना आपले करून घेऊ! असंविधानिक मार्गाने सत्तापालट होत असेल तर निवडणुका घेण्याच्या पद्धतीचा गांभीर्याने विचार करावा लागेल. सध्या भाजप अनेकांना अमृताचे डोस पाजून आपल्या पक्षात सामील करून घेत असल्याने पलटूरामांना अच्छे दिन आले आहेत. एकीकडे न्यायपालिकेचे निकाल धुडकावून लावायचे आणि दुसरीकडे संसदेत वटहुकूम काढून संख्याबळाच्या जोरावर आपल्या बाजूने कायदे संमत करून घ्यायचे प्रकार सुरू आहेत. सत्ताधाऱ्यांनी निवडणूक आयोग, अधिकारी व कर्मचाऱ्यांनाच आपल्या दावणीला बांधले आहे.

निवडणूक आयोगाने यापूर्वी बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना त्याच्यातला एक मोठा गट सत्तेमध्ये सामील झाला आहे त्यांची मेजॉरीटी आहे पक्ष त्यांचाच आहे असा निकाल दिला आणि त्या निकालाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये सुद्धा हेच अपेक्षित होतं. प्रश्न हा आहे की पक्ष सोडून जाणारे काही तात्विक भूमिका घेऊन जातात, का सत्तेबरोबर जायच म्हणून जातात? अनेकांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. हर्षवर्धन पाटलांनी सांगितलंच आहे मी पक्ष बदलून भाजपमध्ये गेलो आणि मी आनंदी आहे. कुठल्या चौकशा माझ्या मागे नाहीत. आता हर्षवर्धन पाटील जे बोलले चौकशा टाळायच्या असल्या तर हा एकमेव राजमार्ग राहिलेला आहे आता लोकांना विचार करायचा आहे की लोकांना देशात विरोधी पक्ष पाहिजे का नाही?

भाजपाचे मुतखेडचे राम चौधरी २५ वर्षे एकटेच लढत होते काय दिले भाजपाने त्यांना? म्हणजे कुठल्याही पक्षा मध्ये नेत्यांची ही सवय झालीय की दुसऱ्या पक्षातली माणसं फोडा आणा आणि वरच्या दोन-चार नेत्यांची सोय करा. आता कार्यकर्त्यांना याचा विचार करावा लागेल. त्याच्यामुळे आजच जे राजकारण चाललंय ते सगळं सत्तेच्या भौती केंद्रित झालेल आहे त्यामुळे जिकडे सत्ता तिकडं माणसं पळायला लागलेली आहेत. भाजपने देशांमध्ये लोकशाही आणि संविधान टिकवावं. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट देशात लोकशाही राहिली पाहिजे इंदिरा गांधींनी सुद्धा आणीबाणी आणली पण लोकांनी लोकांचा कौल आणीबाणीच्या विरोधात दिला त्यावेळी सामान्य माणूस सुद्धा रस्त्यावर उतरला होता. आज देशातले लोक तंत्र वाचवायला हवे आहे लोकशाही वाचवायला हवी आहे आणि विरोधी पक्ष हे लोकशाहीचे प्रमुख अंग आहे. तुम्ही किती पक्ष फोडणार? तुमच्या केलेल्या कामावर तुमचा विश्वास असेल ना तर लोक तुम्हाला निवडून देतील निश्चित तुम्हाला पक्ष फोडायची गरज नाही.

विशेषता भारतीय जनता पक्षाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते यांनी वर्षोन वर्षे अतिशय त्याग करून पक्ष वाढवलेला होता आता त्या पक्षामध्येही ही काय लागन सुरू झालीय की याला घ्या त्याला घ्या. तुम्ही कोणाला घ्यायला लागले आणि कोणाच्या छातीवर बसवायला लागले आणि तुमच्या पक्षात चांगलं काम करणारी जी माणसे आहेत वर्षोंन वर्ष त्याग करणारी आणीबाणी जेलमध्ये गलेली त्यांचे काय? देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ७० हजार कोटीच्या भ्रष्टाचाराचा आरोप अजित पवारांवर केला आणि लागलीच अजित पवार हे त्यांच्या पक्षातले आमदार आणि खासदार घेऊन त्यांच्याच सामील झाले. मला चक्की पीसने को जाना नही है अजित पवारांनी स्वतःच सांगितले, हर्षवर्धन पाटलांनीही तेच सांगितले आपल्या वरच्या आरोप सिद्ध झाले तर आपल्याला जेलमध्ये टाकतील ही भीती असल्यामुळे नेते भाजपमध्ये जातात का?

भाजपमधे अस्वस्थ असणारा मोठा कार्यकर्तावर्ग आहे. जे प्रमाणिक आहेत, जे निष्ठावंत आहेत भाजपाच्या ध्येयधोरणाशी ते अत्यंत अस्वस्थ आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की आम्हाला सत्ता नको. आम्ही जे होतो ते आम्ही प्रामाणिक होतो आमच्या तत्वांशी ध्येयधारेरणांशी. कुठल्याही भाजपाच्या जुन्या जाणत्या लोकांना विचारले तर त्यांचे हेच मत आहे. पण आता तुंम्ही सत्ता हेच सगळ आहे आणि म्हणून सगळे पक्ष तोडून फोडून देशातले लोकतंत्रच नष्ट करणार काय? आताची भाजपची ध्येयधोरण आणि त्यावेळची भाजपची ध्येयधोरण नक्कीच वेगळी आहेत. आताचे भाजपाचे कार्यकर्ते नेते सत्तेचे भूकेले आहेत. भाजपची आजची ध्येयधोरण देशाच्या एकात्मतेला धोका ठरणारी आहेत, या देशाच्या लोकशाहीला बाधा ठरणारी आहेत असं वाटते.

निकालाबाबत बोलायचे झाले तर प्रत्येक संघटना गव्हर्नमेंट आणि नॉन गव्हर्नमेंट ही दबावाखाली आहे. प्रत्यक्षात ज्यांच्यावर कारवाई झाली किंवा ज्यांच्यावर झाली नाही प्रत्येक जण एका मानसिक दबावाखाली आहे. अगदी भाजपच्या प्रामाणिक कार्यकर्त्यासह भाजपचे निष्टावंत प्रामाणिक कार्यकर्ते आहेत तेही दबावाखाली आहेत. शरद पवारांनी राष्ट्रवादीची पायाभरणी केली त्याची वीट न विट लावली या राज्यातच नाही तर देशभरामध्ये राष्ट्रवादी पक्ष पोहोचवला त्यांची अख्खी हयात राष्ट्रवादीसाठी गेली आणि तो पक्षच त्यांचा नाहीये ते चिन्हच त्यांचं नाहीये असं निवडणूक आयोग सांगतोय मग शरद पवारांनी गेल्या ४० ते ४५ वर्षात काय केलं असा प्रश्न उभा रहातो. निवडणूक आयोगाने काय म्हटल याच्यापेक्षा कार्यकर्त्याच्या मनात काय आहे ते विचारणे अपेक्षित आहे? शेतकऱ्याला विचारा, कामगाराला विचारा, कर्मचाऱ्याला विचारा, महिलांना विचारा जे काही समाजामध्ये ज्यांच स्थान आहे उंचावलेल त्याच्यामधे शरद पवारांनी किती श्रम घेतले त्यांना विचारा निवडणूक आयोगाला काय माहित आहे निवडणूक आयोग आपल्या एअर कंडिशन चेंबर मध्ये बसून समोर आलेले चार कागदपत्र पाहून त्यांच्या मनाने निर्णय देतात. दूसरी गोष्ट अशी की पक्ष आणि पक्षचिन्ह कोणी नेलय ते चिन्ह प्रफुल पटेलने की अजित पवारने नेलय म्हणजे जनता प्रफुल पटेल किंवा अजित पावरच्या मागे जाईल अस होणार नाही.

# सीताराम जिंदाल यांचा निसर्गोपचार आणि सेवाभावी कामांत उत्कृष्ट योगदानाबद्दल पद्मभूषण पुरस्काराने सन्मान

सेवाभावी काम व आरोग्यसेवेच्या क्षेत्रातील आदरणीय व्यक्तिमत्वडॉ. सीताराम जिंदालयांनाप्रतिष्ठेचा पद्मभूषण सन्मानप्रदान करण्यात आला आहे. याबद्दल भारतभरात आनंद व्यक्त केला जात आहे. अद्वितीय सेवाभावी प्रयत्नांमधील डॉ. जिंदाल यांच्या महत्त्वपूर्ण योगदानासाठी हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात आला आहे. विशेषत:निसर्गोपचार (नेचरक्युअर) क्षेत्रातील त्यांचे योगदान असामान्य आहे. औषधांविना उपचार करणाऱ्या या उपचारपद्धतीत डॉ. जिंदाल यांनी चाकोरीबाह्य योगदान दिले आहे.जिंदाल नेचरक्युअर इन्स्टिट्यूटची स्थापना त्यांनी केली असून,या कामासाठीच त्यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान प्राप्त झाला आहे.

हरयाणातील नलवा या दुर्गम खेड्यात १९३२ साली जन्मलेल्या डॉ. जिंदाल यांच्या निसर्गोपचाराकडील प्रवास विद्यापीठात शिक्षण घेत असतानाच सुरू झाला. या काळात त्यांना पोटातील क्षयरोगाचा (ॲबडॉमिनल ट्युबरक्युलॉसिस) सामना करावा लागला. त्यांचा आजार बरा होण्याजोगाच नाही असे वाटत असताना त्यांनी एका छोट्या निसर्गोपचार केंद्राचा आसरा घेतला. उपवास,एनिमा आणि अन्य अपारंपरिक उपचार पद्धतींच्या माध्यमातून त्यांना खूपच दिलासा मिळाला. या रूपांतरणात्मक अनुभवामुळे त्यांच्यात निसर्गोपचार व योग यांबद्दल अविचल विश्वास निर्माण झाला.

एक सर्वसमावेशक निसर्गोपचार व योग रुग्णालय स्थापन करण्याच्या इच्छेतून डॉ. जिंदाल यांनी १९७७-७९ या काळात बेंगळुरू शहराबाहेर मोठी जमीन घेतली. त्यातूनच जेएनआयची स्थापना झाली. जेएनआयमध्ये एक सुसज्ज संशोधन विभाग होता आणि जिंदाल ॲल्युमिनिअम लिमिटेडद्वारे (जेएएल) या विभागाला सढळ हस्ते निधी पुरवला जाऊ लागला. निसर्गोपचाराला एका नवीन उंचीवर घेऊन जाण्याप्रती डॉ. जिंदाल यांची बांधिलकी यातून दिसून येते.

त्या काळात प्रचलित असलेल्या पारंपरिक निसर्गोपचार पद्धतींहून पूर्णपणे वेगळ्या मार्गाने जात,या विज्ञानाला आधुनिक स्वरूप देण्याच्या, त्यात नवोन्मेष आणण्याच्या उद्दिष्टाने डॉ. जिंदाल यांनी काम सुरू केले. पारंपरिक निसर्गोपचार पद्धतींमधील उत्साहाचा व विकासाचा अभाव लक्षात घेऊन त्यांनी औषधविरहित पद्धती अधिक प्रगत करण्यासाठी तसेच त्याच्या प्रसारासाठी वाहून घेतले. १९६९ मध्ये स्थापन झालेली एसजे फाउंडेशन ही संस्था त्यांच्या सेवाभावी उपक्रमांसाठी आर्थिक आधारस्तंभ ठरली. त्यांनी हे सर्व काम पूर्णपणे जेएएलच्या पाठबळावर केले. सरकार किंवा अन्य व्यक्तींकडून कोणतीही मदत मागितली नाही.

डॉ. जिंदाल यांच्या अविश्रांत प्रयत्नांचा लक्षणीय प्रभाव औषधविरहित उपचारांच्या क्षेत्रावर पडला. जेएनआय हे एक जागतिक दर्जाचे केंद्र म्हणून प्रस्थापित झाले. दमा,मधुमेह,उच्च रक्तदाब,संधिवात अशा विविध आजारांवर यशस्वीरित्या उपचार करणारे केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. कॅन्सरच्या रुग्णांवरही केंद्रामध्ये उपचार केले जाऊ लागले. या संस्थेत आता ५५० बेड्स आहेत आणि व्याधींवर औषधविरहित उपचार करू इच्छिणाऱ्यांसाठी ही संस्था आशेचा किरण पुरवत आहे.

जेएनआयशिवाय डॉ. जिंदाल यांनी असंख्य सेवभावी उपक्रम राबवले. यातून सामाजिक सुधारणेप्रती त्यांची बांधिलकी दिसून येते. ॲलोपथी रुग्णालये, शाळा व महाविद्यालयांची स्थापना, ग्रामीण विकासाचे उपक्रम, आरोग्यसेवा व शिक्षणाच्या दृष्टीने गावे दत्तक घेणे आणि आरोग्यसेवा व शिक्षण या क्षेत्रांमध्ये अविश्रांत काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना मदत करणे या स्वरूपाचे विपुल काम त्यांनी केले आहे.

डॉ. जिंदाल यांचे सेवाभावी उपक्रम निसर्गोपचारांच्या पलीकडे जाणारे आहेत. त्यांनी नलवा या त्यांच्या मूळगावात आठ सेवाभावी उपक्रमांची स्थापना केली आहे. याचा लाभ या परिसरातील मोठ्या लोकसंख्येला होत आहे. वंचित



समुदायांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तींच्या माध्यमातून मदत करणे तसेच आरोग्यसेवा व शिक्षण यांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनी आर्थिक मदत देणे यांतून त्यांचे सामाजिक कल्याणाप्रती असलेले समर्पण दिसून येते.

डॉ. जिंदाल यांच्या कामाचा प्रभाव जेएनआयच्या पलीकडेही जाणवतो. आरोग्याकडे बघण्याचा त्यांचा सर्वांगीण दृष्टिकोन,निसर्गोपचार व योगावर भर देणे यांमुळे जगभरातील लक्षावधी लोकांच्या आयुष्यांमध्ये परिवर्तन घडून आले आहे. प्रतिबंधात्मक उपायांप्रती तसेच औषधांच्या साइड-इफेक्ट्सबद्दल जागरूकता निर्माण करण्याप्रती त्यांची बांधिलकी,निसर्गोपचार ॲलोपॅथिक रुग्णांवरील ताण लक्षणीयरित्या कमी करू शकतो या त्यांच्या विश्वासाशी संलग्न आहे.

या संपूर्ण प्रवासात डॉ. जिंदाल यांनी असंख्य नवोन्मेषकारी उत्पादने आणि उपचारपद्धती विकसित केल्या. अनेक आजारांवर ते गुणकारी ठरत आहेत. सुलभ ॲबडोमेन पॅक्सपासून हर्बल चहांपर्यंत, स्पायनल बाथ टब्ज, थंड व उष्ण रिफ्लेक्सॉलॉडजी ट्रॅक्सपर्यंत अनेक नवोन्मेषकारी उत्पादने त्यांनी विकसित केली आहेत. त्यांच्या योगदानामुळे निसर्गोपचाराच्या कक्षा रुंदावल्या आहेत.

डॉ. जिंदाल यांच्या द्रष्ट्या नेतृत्वाची आणि अफाट योगदानाची दखल अनेक महान व्यक्तींनी घेतली आहे. यामध्ये अटल बिहारी वाजपेयी, चंद्रशेखर, इंद्रकुमार गुजराल, एच.डी.देवेगौडा हे माजी पंतप्रधान, माजी उपपंतप्रधान देवीलाल आणि कर्नाटकाचे माजी मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांचा समावेश होतो.

समाजाच्या कल्याणासाठी डॉ. जिंदाल यांनी केलेले अविश्रांत प्रयत्न हे आरोग्यसेवेच्या पलीकडील आहेत. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) या संकल्पनेचा त्यांनी जोरदार पुरस्कार केला.

उद्योजकांनी त्यांच्या नफ्याचा काही भाग दारिद्र्य निर्मूलनाच्या कामासाठी द्यावा असे आवाहन त्यांनी केले. उद्योगांसाठी निश्चित करून दिलेली सीएसआरची टक्केवारी वाढवण्यासाठी अद्याप ते सरकारसोबत संघर्ष करत आहेत. यातून समाजाच्या कल्याणाप्रती त्यांची अविचल बांधिलकी दिसून येते.

डॉ. सीताराम जिंदाल यांचे आयुष्य व कार्य म्हणजे व्यावसायिक यश व मानवतेच्या अनुकंपायुक्त सेवेचा सौहार्दपूर्ण संयोग आहे. निसर्गोपचार व सेवाभावी कामातील समर्पणाच्या माध्यमातून त्यांनी आरोग्यसेवा व सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रांवर कधीही पुसला न जाणारा ठसा उमटवला आहे. म्हणूनच ते पद्मभूषण सन्मानाचे पात्र मानकरी ठरले आहेत.

### प्रख्यात व्यक्तिमत्वांद्वारे प्रशंसा

१. श्री. अटल बिहारी वाजपेयी,भारताचे माजी पंतप्रधान:जिंदाल इन्स्टिट्यूट ऑफ नेचरोपथीमध्ये मी घालवलेले १० दिवस माझ्या स्मृतीच्या पटावर नेहमीच लखलखीत ताऱ्या प्रमाणे चमकत राहतील. वैद्यकशास्त्राच्या अन्य शाखांच्या तुलनेतनिसर्गोपचार ही अधिक चांगली व्यवस्था आहे. कारण यात आजार दूर करण्यासाठी औषधांचा वापर केला जात नाही. ही संस्था स्थापन केल्याबद्दल मी डॉ. सीताराम जिंदाल यांचे अभिनंदन करतो.

२. श्री. चंद्रशेखर,भारताचे माजी पंतप्रधान:मला आणि पिलू मोदी यांना या संस्थेत येण्यास भाग पाडल्याबद्दल मी माझे मित्र वीरेन शहा यांचा ऋणी आहे. त्यामुळेच आम्ही या संस्थेत चाललेले मानवतेच्या सेवेचे महान कार्य स्वत: बघू शकलो. श्री. सीताराम जिंदाल यांनी हा प्रकल्प हाती घेतला याचा मला आनंद वाटतो. त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. मी त्यांना शुभेच्छा देतो.

३. श्री. आय. के. गुजराल,भारताचे माजी पंतप्रधान: मी आणि माझी पत्नी दोघांनीही येथे ३ अविस्मरणीय आठवडे घालवले आणि निसर्गोपचार व योगाच्या दैनंदिन आयुष्यातील उपयुक्ततेबाबतची आमची मतेच बदलून गेली. येथे राहणे आमच्यासाठी खूप चांगले ठरले आहे. श्री. एस. आर. जिंदाल यांनी या संस्थेच्या स्वरूपात राष्ट्राला अनोखी भेट दिली आहे. ते अत्यंत द्रष्टे आहेत. त्यांचे समर्पण व मानवी मूल्यांप्रती त्यांची निष्ठा वाखाणण्याजोगी आहे.

४. श्री. एच. डी. देवेगौडा,भारताचे माजी पंतप्रधान:मी डॉ. सीताराम जिंदाल यांना गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून उद्योजक व दानशूर व्यक्ती म्हणून ओळखतो. ते ग्रामीण भागातील गरीबांसाठी खूप काम करत आहेत. शिक्षण,आरोग्य,पेयजल आदी क्षेत्रांतील त्यांच्या सेवेबद्दल अनेक गावकरी त्यांचे ऋण व्यक्त करतात. बेंगळुरूमध्ये इन्स्टिट्यूट ऑफ नेचरोपथी स्थापन करून त्यांनी एक पाऊल पुढे टाकले आहे. हे एक आधुनिक औषधविरहित निसर्गोपचार रुग्णालय आहे. त्याचप्रमाणे येथे अनेक सेवाभावी उपक्रमही राबवले जातात.


५. श्री. देवी लाल,भारताचे माजी उपपंतप्रधान:निसर्गरम्य परिसरात स्थापन करण्यात आलेली ही निसर्गोपचार संस्था शरीराला आणि मनालाही अत्यावश्यक असा दिलासा पुरवते. माझ्या १५ दिवसांच्या मुक्कामामध्ये मला तर खूपच लाभ झाला. श्री. सीतारामजी स्वत:च्या खर्चाने मानवतेचे कल्याण करणारी उत्तम सेवा देत आहेत.

६. श्री. रामकृष्ण हेगडे,कर्नाटकाचे माजी मुख्यमंत्री:मी या संस्थेत नेमाने वर्षातून एकदा येतो आणि १० दिवस येथे राहतो. हे मी गेल्या अकरा वर्षांपासून करत आहे. ही जगाच्या पाठीवरची सर्वोत्तम संस्था आहे. आदर्श वातावरणात असलेल्या या संस्थेत पारंपरिक व आधुनिक अशा दोन्ही प्रकारच्या सुविधा आहेत. ही अनन्यसाधारण संस्था स्थापन करणाऱ्या श्री. सीताराम जिंदाल यांची प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे.

# स्वैराचाराला प्रोत्साहन देणारा 'व्हॅलेंटाईन वीक'

प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं.. तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं !' असे मंगेश पाडगावकरांनी कवितेतून सांगितले असले तरी हल्लीच्या प्रेमात सुद्धा बरेच प्रकार तयार झाले आहेत. सकाम आणि निष्काम प्रेम हे त्यातील मुख्य प्रकार. आपल्यावर प्रेम आहे म्हणणारी व्यक्ती आपल्यावर निष्काम प्रेम करते कि त्यामागे तिचा काही हेतू दडला आहे हे ओळखणे आजच्या काळात अत्यावश्यक बनले आहे. प्रेमातील फसवणुकीची प्रकरणेही हल्ली वाढली आहेत. यामध्ये बऱ्याचदा बळी जातो तो मुलीचा. प्रेमात फसवणूक झाल्याने दरवर्षी कितीतरी मुलींचे आयुष्य उध्वस्त होते, तर कितीतरी जणी निराश होऊन मृत्यूला कवटाळतात. मुलींचे मनच मुळात भावनाशील असल्याने प्रेमात अशाप्रकारे वर्गवारी करणे प्रत्येकीला जमतेच असे नाही. मुलींच्या याच कमजोरीचा फायदा घेणारे, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची फसवणूक करणारे, तिच्या भावनांशी खेळणारे राक्षसीप्रवृत्तीची माणसे आज चोहोबाजूंनी पसरलेली आहेत, त्यामुळे आता मुलींना प्रेमात आंधळे होणे परवडणारे नाही.

काहीजण म्हणतील प्रेम केले जात नाही, तर ते आपसूकच होते. असे असेल, तर दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी या सात दिवसांत तरुणवर्गामध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा 'व्हॅलेंटाईन वीक'चा उहापोह कशासाठी ? हा सप्ताह नेमका प्रेमाचा असतो कि स्वैराचाराचा ? 'व्हॅलेंटाईन वीक'च्या स्वागतासाठी भेटवस्तूंची दुकाने मागील तीन-चार दिवसांपासून सजली आहेत, वृत्तवाहिन्यांतून सौंदर्य तज्ज्ञांना निमंत्रित करून 'व्हॅलेंटाईन वीक'साठी मुलींनी कशा प्रकारे तयारी करावी याबाबतच्या 'टिप्स' दिल्या जात आहेत. 'कॉलेज कॅम्पस'मध्ये सुद्धा सध्या याच विषयाची चर्चा रंगलेली दिसून येते. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळून ७६ वर्षे उलटली. मात्र त्यांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीच्या जोखडातून आपण अद्याप मुक्त झालो नसल्याचा प्रत्यय दर वर्षी 'व्हॅलेंटाईन वीक' सुरु झाला कि येऊ लागतो. 'व्हॅलेंटाईन डे'ची 'क्रेझ' जेव्हढी भारतात पाहायला मिळते तेव्हढी अन्य पाश्चिमात्य देशांमध्ये क्वचितच असावी. ७ फेब्रुवारीपासून १४ फेब्रुवारीपर्यंत विविध 'डेज' भारतासारख्या संस्कृतीप्रिय राष्ट्रात तरुण तरुणींकडून उत्साहाने साजरे केले जातात. शहरातील ही 'क्रेझ' हळूहळू ग्रामीण भागातही पसरू लागली आहे. मातृभाषेला डावलून इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना घालण्याकडे पालकांचा वाढत चाललेला कल हेच यामागील प्रमुख कारण असावे.



या दिवसांत अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात शैक्षणिक वातावरण बिघडवणाऱ्या घडामोडी घडत असतात. परीक्षेच्या तयारीच्या दिवसांत काही चंगळवादी युवक युवतींची भलतीच तयारी सुरु असते. ज्याचा परिणाम शाळा महाविद्यालयांतील अन्य विद्यार्थीवर्गावर होत असतो. अनेक ठिकाणी शाळा-महाविद्यालय प्रशासनही या गोष्टींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते याचे खरेतर नवल वाटते. या दिवसांत 'डेज'च्या निमित्ताने पालकांच्या पैशांची तरुणांकडून मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली जाते. या ७ दिवसांमध्ये गर्भनिरोधक साधनांचा खपही वाढत असल्याचे एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. असल्या विदेशी भोगवादी दिवसांच्या मौजमजेमध्ये काडीमात्र रुची नसणाऱ्या अनेक मुलींना या 'डेज'चा कमालीचा मनस्ताप होतो. 'रोज डे', 'प्रपोझ डे', 'प्रॉमिस डे', 'किस डे', 'हग डे', 'चॉकोलेट डे' आणि 'व्हॅलेंटाईन डे' यांसारख्या डेजच्या निमित्ताने किशोरवयीन मुलींवर घातला जाणारा दबाव त्यांच्या मानसिक आरोग्यावर घातक परिणाम करतो. कितीतरी मुली या दिवसांत वासनांधांच्या खोट्या प्रेमाला भुलतात आणि आपल्या आयुष्याची राखरांगोळी करतात. लव्ह जिहादची प्रकरणे देशाच्या कानाकोपऱ्यातून वाढू लागली आहेत. अशांसाठी हे डेज म्हणजे 'इप्सित साध्य करण्यासाठी मिळालेली पर्वणीच असते. प्रेमाला भारतीय संस्कृतीने नेहमीच पवित्र आणि उच्च स्थान दिले आहे; मात्र प्रेमाच्या नावाखाली घातला जाणारा बाजार आणि चालणारा स्वैराचार आपल्या संस्कृतीला नक्कीच शोभणारा नाही. भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा 'व्हॅलेंटाईन वीक' आपल्या देशात हवा तरी कशाला ?

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

## पुरस्काराचा सन्मान!

नाटक, चित्रपट, मालिका या माध्यमातून अभिनय कसा असतो, तो कसा करतात, अभिनय म्हणजे काय याचे उत्तर अनेक जण आपापल्या परीने देतीलही पण एका वाक्यात सांगायचं झालं तर अभिनय म्हणजे अशोक सराफ. ज्याला अतिरेकी अभिनय आणि अभिनय, संवाद यांची लक्ष्मण रेषा पुरेपूर ठाऊक आहे असा अभिनेता. सहज सुंदर अभिनयातून गेले अनेक वर्ष रसिकांच्या चेहऱ्यावर हासू तर क्षणात लिलया आसू आणणारे नटसम्राट अशोकजी सराफ सरांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला हे ऐकून आनंद वाटला. भविष्यातही विविध माध्यमातून त्यांच्या अभिनयाचे विविध कंगोरे असेच चिरंतर पाहण्याचे भाग्य आम्हा रसिकांना लाभत राहावेत.

## वृक्ष लागवडीला प्राधान्य द्या !

महामार्ग विभागाच्या वतीने मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर प्रवाशांसाठी विश्रांती क्षेत्रांची सोय केली जात आहे मी समाधानकारक बाब आहे मात्र त्यांची देखभाल, स्वच्छता सातत्याने, काटेकोरपणे होत रहावी शिवाय अन्य ठिकाणीही अशा सोयी व्हाव्यात अशी अपेक्षा करीत असताना वृक्षाविना उजाड झालेल्या महामार्गाच्या दोन्ही बाजूंना शक्य तितक्या लवकरात लवकर मुहूर्त पाहून वृक्ष लागवड सुरू करणे अत्यंत निकडीचे, महत्वपूर्ण आहे जेणेकरून निदान उद्याच्या युवा पिढीला प्रवासात नैसर्गिक सावलीचा आनंद घेता येईल.

## सुंदर हस्ताक्षर ही चळवळ व्हावी !

सुंदर हस्ताक्षर, दुसऱ्याला समजेल, उमजेल इतकं टापटीप, वळणदार असण ही एक श्रीमंतीच. मात्र या श्रीमंतीकडेच सगळीकडून दुर्लक्ष होतय असं म्हटल्यास वावगे होणार नाही यात प्रामुख्याने शाळाही अपवाद नाहीत. या पार्श्वभूमिवर भावी पोलिसांसाठी सुंदर हस्ताक्षर

जनसंवाद

सराव, प्रशिक्षण वर्ग राबविण्यात येत असल्याची समाधान देणारी बातमी वाचनात आली. खरंतर बालविद्यार्थी दशेतील पहिल्या पायरी पासूनच प्रत्येक शाळेतून सुंदर हस्ताक्षरांची जाणीव, महत्त्व , गोडी लागण्यासाठी विविध उपक्रम राबविणे गरजेचे वाटते परंतु असं घडताना दिसत नाही. शाळांमधून सुंदर हस्ताक्षर सराव वर्ग सुरू होणे जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच सामाजिक संस्थांनी विविध माध्यमांच्या द्वारे सुंदर हस्ताक्षर चळवळ उभी केली तर उद्याच्या जगात विविध क्षेत्रात प्रवेश करणारी भावी पिढी एक अक्षर श्रीमंती घेऊनच वावरेल.

## ज्ञानमंदिर की व्यापारी केंद्र ?

केवळ शाळेची फी न भरल्यामुळे भर परीक्षेतून विद्यार्थ्याला वर्गाबाहेर काढण्याचा शाळेचा पराक्रम धक्कादायकच तर आहे. कोणताही पालक जाणून बुजून फी थकविण्याचा किंवा बुडविण्याचा विचारही करीत नसतो. परंतु ज्ञानमंदिरांचे रूपांतर व्यापारी केंद्रात होत असल्याचे हे उदाहरण म्हटल्यास वावगे होणार नाही.

## जाऊ बाई गावात उत्तम !

विविध ठिगळ जोडत, ओढून ताणून कथानकाची लांबी वाढवीत प्रेक्षकांचा अंत पाहणाऱ्या मालिकांपेक्षा सध्यातरी झी मराठीवरील बिग बॉस धरतीवर असलेल्या जाऊ बाई गावात ही मालिका पहावयाशी वाटते. कोणताही भपकेबाजपणा, अतिरंजीतपणा न आणता, सरळ, साधे, सोपे ग्रामीण भागातील वास्तववादी दैनंदिनी जीवन, सोबत ग्रामीण भागातील जनवेदना, समस्या, कष्ट, अडचणी यांचं हसत, खेळत यथार्थ दर्शन, जाणीव आजच्या नव्या शहरी पिढीला घरबसल्या घडवलं जातंय हे फार महत्वपूर्ण वाटते. मात्र नुकत्याच एका कार्यक्रमात स्पर्धकांचे फोटो जाळण्याचा जो एक प्रसंग दाखविण्यात आला तो मात्र खटकला एवढेच.

## प्रथम टोलनाके वेगवान करा !

वेगवान आणि कोंडीमुक्त प्रवासासाठी मुंबईतील उड्डाणपूलांची पुनर्बांधणी अथवा नवीन उभारणी साठी मुंबई महापालिकेने करोडो रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद केली आहे, असो. खरं पहाता मुंबई नजीक, जवळपास असलेल्या टोल नाक्यातून सुरू होणारी वाहन कोंडी प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे, कळत, नकळत मुंबईतील वेगवान वाहतूकीवर, कोंडीवर परिणाम करीत असते असं म्हटल्यास ते चुकीचे ठरेल असे नाही, आणि म्हणूनच सर्वप्रथम टोल नाक्यांवर होणारी वाहतूक कोंडी, तेथील विस्कळीतपणावर मार्ग शोधणे, मार्ग काढणे महत्त्वाचे आहे, तेव्हांच कुठे मुंबईतील वेगवान प्रवासाला मार्ग सापडेल, कोंडीला वाट फुटेल.

**विश्वनाथ पंडित**

दैनिक सिंधुदुर्ग समाचार (मुख्य आवृत्ती सिंधुदुर्ग) : संस्थापक, संपादक कै.प्राचार्य मुकुंदराव कदम (MA,LLB), मालक, मुद्रक, प्रकाशक : ॲड.रूपाली मुकुंद कदम डांगे (BSL,LLB,MCA) R.N.INo. 43711/85 संपादक : अँड रूपाली मुकुंद कदम डांगे मुद्रणस्थळ : न्यु विक्रम मुद्रणालय, एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, येथे छापून प्रकाशन स्थळ/कार्यालय : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ : एम/एस विक्रम मुद्रणालय १०३ मेन रोड, कणकवली जि. सिंधुदुर्ग, महाराष्ट्र-४१६००२, उपसंपादक : विक्रम मुकुंद कदम, कार्यकारी संपादक मंडळ : प्रा. ऊज्वला कदम राठौर, डॉ.शर्मिला कदम राजपुत, ई मेल-कार्यालयीन पत्रव्यवहारासाठी व जाहिरातीसाठी संपर्क : rupasamachar@gmail.com, बातमी व फोटोसाठी संपर्क sindhudurg.samachar@gmail.com सिंधुदुर्ग-फोन: (०२३६७) २३१९२५, फॅक्स-२३२१०१ वेंगुर्ला : बी.के.रोड फोन : २६३७४६, मुंबई/पुणे फोन : ९८२२९७९७३२, रत्नागिरी : गाळा नं. ३८, २ रा मजला, कोल्हापूर अरिहंत अर्पार्टमेंट फोन : (०२३१) २५२३००५ मुंबई संपर्क कार्यालय सत्यवान बिल्डींग पडवळनगरए ठाणे (वेस्ट)४००६०४

# कार्यकारी अभियंत्यांचे मुंबई दौरे नेमके कशासाठी?

**मालवण । वार्ताहर**

गेले अनेक दिवस सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कार्यालयात जनतेसाठी उपलब्ध होत नाहीत. पालकमंत्री तथा बांधकाम मंत्री जिल्ह्याच्या दौऱ्यात असतानाही कार्यकारी अभियंता मुंबईचे दौरे करत आहेत. त्यांचे हे मुंबईचे दौरे नेमके कशासाठी असा प्रश्न उपस्थित करत त्यांच्या कारभाराची सखोल चौकशी करावी,

अशी मागणी माजी आमदार परशुराम उपरकर यांनी येथे पत्रकार परिषदेत केली. येथील शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी विनोद सांडव, प्रसाद गावडे, दीपक गावडे, राजेश टंगसाळी, आप्पा मांजरेकर, आशीष सुभेदार, मंदार नाईक, संदीप लाड, अमित इब्रामपूरकर विल्सन गिरकर आदी उपस्थित होते. श्री.उपरकर म्हणाले, कोणत्याही रस्त्याचे आधी कामे नंतर निविदा बनवल्यामुळे कामे निकृष्ट होत आहेत. सर्वच रस्त्यांना खड्डे पडले आहेत.

रस्त्यांची कामे जादा दराने करून ठराविक त्यांच्या लाडक्या ठेकेदारांना दिली जातात. अंदाजपत्रके देखील वाढवली जातात. अशाप्रकारची कामे नौसेना दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने मालवणमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने घाई गडबडीत उरकण्यात आली होती. यात हेलिपॅड व त्याला जोडणारे रस्ते तसेच राजकोट किल्ल्यावरील शिवाजी महाराजांचा पुतळा बनवण्यासाठी चबुतरा व



राजकोट किल्ल्याच्या प्रवेशद्वाराचे सुशोभीकरण यांचा समावेश आहे. या कामात भ्रष्टाचार अपहार झाल्याचा आमचा गंभीर आरोप आहे. या कामाच्या अंदाजपत्रकात व प्रत्यक्ष केलेल्या कामात तफावत आढळून येत आहे.

आम्ही केलेल्या पाहणीनुसार सुमारे ७५ टक्के ज्यादा अंदाजपत्रक म्हणजेच अंदाजपत्रकाच्या फक्त २५ टक्के काम जाग्यावर दिसत आहे. शासनाच्या निधीचा मोठ्या प्रमाणात अपहार झाला असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाची माहिती कार्यकारी अभियंता आपल्या कार्यालयात आम्हाला देत नाहीत, असाही आरोप श्री. उपरकर यांनी केला.

मालवण मधील नागरिक व माजी आमदार परशुराम उपरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने आज नौसेना दिनानिमित्त मालवण मध्ये झालेल्या कामांच्या ठिकाणी भेट दिली व मोजमापे घेतली. यावेळी काही ठिकाणचे रस्ते घुशींनी पोखरून काढल्याचेही दिसून आले. त्यांचा प्रशासकीय कारभार संशयास्पद वाटत असून सुट्टीचा दिवस सोडून अन्य वेळी कार्यालय प्रमुखाने कार्यालयात हजर राहणे बंधनकारक असून कार्यकारी अभियंता यांचा वावर पनवेल कर्जत मुंबई या शहरात असल्याचे आमचे ठाम मत आहे. पूर्व कल्पना देऊनही प्रशासकीय कामासाठी बाहेर असल्याचे कारण देत भेट देण्यासाठी वारंवार टाळाटाळ करत आहेत.

कार्यकारी अभियंता यांच्या पद नियुक्तीनंतर सिंधुदुर्गात झालेल्या अन्य कामांची चौकशी आपल्याकडून व्हावी तसेच अन्य रस्त्यांच्या केलेल्या कामांची सखोल चौकशी स्टफवेल सारख्या यंत्रणेमार्फत व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## डीएड बेरोजगार उमेदवारांना शिक्षक पदी नियुक्ती द्या

**सिंधुदुर्गनगरी । प्रतिनिधी**

डीएड बेरोजगार संघर्ष समितीच्या उमेदवारांना अग्रक्रमाने प्राधान्य देऊन शिक्षक पदी नियुक्ती द्याव्यात. या मागणीसाठी आज माजी आमदार राजन तेली यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील बेरोजगार संघर्ष समितीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निवेदनाद्वारे लक्ष वेधले.



सिंधुदुर्ग जिल्हा डीएड बेरोजगार संघर्ष समितीच्या वतीने आज अध्यक्ष विजय फाले यांच्या नेतृत्वाखाली व माजी आमदार राजन तेली यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मकरंद देशमुख यांची भेट घेतली. व त्यांना आपल्या मागणीचे निवेदन सादर केले.

या निवेदनातून त्यांनी डीएड बेरोजगारावर होणाऱ्या अन्यायाबाबत लक्ष वेधले, तर एका बाजूने पोल्टल भरती आणि दुसऱ्या बाजूने परिपत्रकानुसार नियुक्त्या यामुळे डीएड बेरोजगार उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. न्यायासाठी उपोषणास बसलेल्या व गेली अनेक वर्ष नोकरीसाठी संघर्ष करणाऱ्या डी एड बेरोजगारांवर अन्याय होणार आहे. शाळा व्यवस्थापन समितीला तात्पुरत्या शिक्षक नियुक्तीचे अधिकार दिल्याने आपल्या मर्जीतील उमेदवारांना घुसवण्याचा प्रयत्न होणार आहे.

तरी डीएड बेरोजगार संघर्ष समितीच्या उपोषणकर्त्या ३०० उमेदवारांना या भरतीत प्राधान्याने सामावून घ्यावे.

त्यांना तालुका निहाय यादी प्रमाणे आपल्या स्तरावरून शाळा निश्चित करून द्यावी. तसेच परिपत्रकात डीएड व बीएड असा उल्लेख असल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे परिपत्रकातून बीएड चा उल्लेख वगळावा. तसेच सद्यस्थितित कार्यरत असलेले (डीएड पदवी धारण न केलेले) उमेदवार यांना सामावून न घेता डीएड झालेल्या स्थानिक उमेदवारांना प्राधान्याने संधी मिळावी.

पटसंख्येची अट शिथिल करून रिक्त असलेल्या सर्व शाळातील जागा भराव्यात. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाने निवड करण्यात आलेल्या उमेदवाराला प्राधान्यने नियुक्ती देणे शाळा व्यवस्थापन समितीला बंधनकारक करावे.

तसेच तात्पुरत्या नियुत्या बाबत उमेदवारांमध्ये झालेला संभ्रम दूर करावा. अशी मागणी यावेळी डीएड उमेदवारा नी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

## 'पंतप्रधान' देशाचा असतो, पक्षाचा नाही'; शरद पवारांचा दिल्लीतून हल्लाबोल

पान १ वरून..

केलं त्यामध्ये आपल्याला नेहरूंचं नाव विसरता येणार नाही. जवाहरलाल नेहरू यांनी पंतप्रधानपदाची जबाबदारी खांद्यावर घेतली आणि देशाला प्रजासत्तेच्या मार्गावर घेऊन गेले आणि आज जी लोकशाही आपण बघत आहोत त्या लोकशाहीला ताकद देण्याचं काम नेहरू यांनी केलं. त्यासोबतच देशाच्या विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान, जलसंपदा अशा क्षेत्रांत त्यांनी काम केलं. असं योगदान देणाऱ्या पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्यावर विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज टीका केली, अशा शब्दांत शरद पवार यांनी आपली नाराजी व्यक्त केली. राजकारणात वेगवेगळी विचारधारा असते, मतभिन्नता असते, मात्र ज्यांनी देशासाठी काम केलं त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. मग ते जवाहरलाल नेहरू असोत, लाल बहाद्दूर शास्त्री असतील किंवा इंदिरा गांधी, या नेत्यांनी देशासाठी काही ना काही काम केलं आहे. पंतप्रधान मोदींनी त्यांच्यावर टीका केली असली तरी असा चुकीचा इतिहास पसरवणाऱ्या विचारसरणीला दूर ठेवण्याचं काम देशातील नवी पीढी करेल, असा विश्वासही यावेळी शरद पवारांनी व्यक्त केला. दरम्यान, केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीतील राजकीय संघर्षावर निकाल देत अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गट हाच मूळ राष्ट्रवादी काँग्रेसपक्ष असल्याचं सांगितलं आहे. राज्यसभा आणि लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर शरद पवारांसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपच्या दबावातूनच निवडणूक आयोगाने हा निकाल दिल्याचा आरोप शरद पवार गटाकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार हे आगामी काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपविरोधात आणखी आक्रमक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### रेखाकला परिक्षेत देसाई स्कूलचे यश

**वेंगुर्ले । वार्ताहर**

महाराष्ट्र शासन कला संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या शासकिय रेखाकला मध्ये प्रि.एम. आर.देसाई इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. शाळेतील निधी पालकर, केतकी चेंदवणकर, चिन्मय पेडणेकर या विद्यार्थ्यांनी 'अ' श्रेणी प्राप्त केली. इतर विद्यार्थ्यांनी 'ब' व 'क' श्रेणी प्राप्त करत यश संपादन केले. या विद्यार्थ्यांना कला शिक्षक पांडुरंग मिशाळ यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल शिक्षण प्रसारक मंडळ कोल्हापूरचे सचिव प्रा.जयकुमार देसाई, पेट्रॉन कौन्सिल मेंबर दौलतराव देसाई, चेअरमन डॉ. मंजिरी देसाई-मोरे, यांनी अभिनंदन केले आहे.

## दुर्गम निडलीसह केर गावाला भरघोस निधी देणार शिवसेना तालुकाध्यक्ष गणेशप्रसाद गवस यांची ग्वाही

**दोडामार्ग । वार्ताहर**

केर गावातील निडलीवाडी विकासापासून थोडी दूर होती, मात्र आमच्या सरकारने विकासकामासाठी निधी देऊन या वाडीला विकासाच्या कक्षेत आणले आहे. यापुढेही निडलीवाडीसह केर गावाला भरघोस निधी दिला जाईल अशी ग्वाही शिवसेना (शिंदेगट) तालुकाध्यक्ष गणेशप्रसाद गवस यांनी दिली.



केर गावातील विविध विकासकामांचा शुभारंभ बुधवारी संपन्न झाला. यावेळी तालुका प्रमुख गणेशप्रसाद गवस बोलत होते. त्यांच्यासोबत जिल्हा समन्वयक शैलेश दळवी, जिल्हा नियोजन समिती सदस्य राजेंद्र निंबाळकर, सावंतवाडी विधानसभा अध्यक्ष प्रेमानंद देसाई, उपतालुका प्रमुख दादा देसाई, महिला तालुकाप्रमुख चेतना गडेकर, महिला उपतालुकाप्रमुख सर्पोरा शेख, केर सरपंच रुक्मिणी नाईक, उपसरपंच तेजस देसाई, सदस्य गायत्री देसाई, लक्ष्मण घारे, शहरप्रमुख शीतल हरमलकर, विभागप्रमुख सानवी गवस, झोळंबे सरपंच राजेश देसाई, रामदास मेस्त्री, रेखा लोंढे, ठेकेदार सचिन देसाई, माजी विस्तार अधिकारी रामा ठाकूर उपस्थित होते.

यावेळी जिल्हा नियोजन समिती सदस्यपदी श्री. निंबाळकर, विधानसभा अध्यक्ष श्री. देसाई यांनीही केर गावाच्या विकासासाठी निधी मिळण्यासाठी मंत्री दिपक केसरकर यांच्याकडे मागणी केली जाईल आणि नेहमी झुकते माप असेल असे सांगितले. निडलवाडीच्यावतीने येथील जेष्ठ ग्रामस्थ विष्णू देसाई, नवल गावडे यांनी आवश्यक विकासकामाची मागणी केली त्यानंतर उपस्थित प्रतिनिधीनी विकासनिधी देण्याची ग्वाही दिली.

## थोडक्यात



### विठुरायाचा गजर करत वारकरी पंढरपूरकडे मार्गस्थ...!

**कणकवली । वार्ताहर**

परमहंस भालचंद्र महाराज यांची पालखी घेऊन वारकरी व भक्तगण भालचंद्र महाराजांचा आणि विठुरायाचा गजर करत टाळ वाजवत कणकवलीहुन पंढरपूरच्या दिशेने मंगळवारी सकाळी मार्गस्थ झाली. परमहंस भालचंद्र महाराज वारकरी पायी दिंडी मंडळ सिंधुदुर्ग यांच्यावतीने सिंधुदुर्ग ते श्री क्षेत्र पंढरपूर असा परमहंस भालचंद्र महाराज पालखी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कलमठ गोसावीवाडी येथे सकाळी ७ वाजता ह. भ. प. गवंडळकर महाराज व ह. भ. प. गायकवाड महाराज यांच्या शुभहस्ते आणि हरिभक्तांच्या उपस्थितीत कलश, तुळस, चोपदारदंड, टाळ, पताका पूजन करून ८ वाजता भालचंद्र महाराज संस्थान येथून पालखी घेऊन प्रस्थान करण्यात आले.

### जुवे मळी येथे नेपाळी तरुणीची गळफास घेत आत्महत्या

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

शहरातनजीकच्या जुवे मळी येथील आंबा बागेत नेपाळी तरुणीने ओढणीने गळफास घेत आत्महत्या केली.ही घटना रविवार ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७.२० वा.उघडकीस आली. सुमन लालवीर बिका (२४,रा.मुळ रा.नेपाळ सध्या रा.जुवे,रत्नागिरी) असे गळफास घेत आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. सुमन बिका ही जुवे मळी येथील प्रसाद चव्हाण यांच्या आंबा बागेत कामाला होती. रविवारी सायंकाळी तीने अज्ञात कारणातून बागेतीलच एका आंब्याच्या झाडाला ओढणीने गळफास घेत आत्महत्या केली. ही बाब तेथील इतर कामगारांच्या निदर्शनास येताच त्यांनी गावातील इतर नागरिकांच्या मदतीने तिने फास लावलेली ओढणी कोयतीने कापुन खाली उतरवून खाजगी गाडीने जिल्हा शासकिय रुग्णालयात दाखल केले.

### जमिनीच्या वादातून बंदूक रोखली

**मालवण । वार्ताहर**

मसुरे देऊळवाडा येथील भाजप कार्यकर्ते महेश राजाराम बागवे (५७) यांच्यावर सिंगल बॅरल काडतुसाची बंदूक रोखून मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी अश्विन नारायण गावडे (रा. मसुरे मर्डे बाजारपेठ) याच्यावर शस्त्र परवाना अधिनियम १५९ चे कलम ३, २५, भादंवि कलम ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. महेश बागवे व त्यांचा मुलगा सागर, डंपर चालक ऋषिकेश नेरुरकर आणि जेसीबी ऑपरेटर हे मागवणे घाटी येथील अनिल वंजारी यांच्या सामाईक जमिनीतील माती काढत असताना अश्विन गावडे हा गाडी घेऊन आला.

## पान १ वरून

### अरुणा धरणाच्या कालव्याचे काम बंद; आंदोलन सलग तिसऱ्या दिवशीही सुरु

येथे विहीर मारण्यात आली होती. या विहीरीवरुन गावठाणाला नळयोजनेद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. या विहीरीचा ताबा पुनर्वसन गावठाणाला दयावा. अशी मागणी धरणग्रस्तांकडून करण्यात येत आहे. मात्र आता ही विहीरच पुनर्वसन गावठाणासाठी नसाल्याचे आता पाटबंधारे विभागाकडून सांगण्यात येत आहे. ही विहीर नाही तर आम्हांला दुसरी विहीर मारुन दया. अशी मागणी धरणग्रस्त करीत आहेत.

मात्र याबाबत संबंधित विभागाकडून ठोस निर्णय घेण्यात येत नाही. त्यातच गेले आठ दिवस या विहीरीवरील नळयोजाना बिघाडामुळे बंद आहे. त्यामुळे धरणग्रस्तांवर पाणी पाणी करण्याची वेळ आली आहे.

त्याचबरोबर पुनर्वसन गावठाणातील अन्य समस्यां कायम आहेत. धरणग्रस्तांच्या सभेत पाटबंधारे विभागाकडून आश्वासन देण्यात येते. मात्र त्यावर कोणतीही कार्यवाही होत नाही. त्यामुळे नाईलाजास्तव आम्हांला काम बंद आंदोलन करण्याची वेळ आली आहे.

प्रकल्पासाठी आम्ही गाव घर सोडले. त्या धरणग्रस्तांवर त्यांच्या न्याय मागण्यासाठी शासन दरबारी हेलपाटे मारावे लागत आहेत. अशी तीव्र नाराजी धरग्रस्तांकडून व्यक्त केली जात आहे. गेले तीन दिवस वयोवृध्द पुरुष, महिला धरणग्रस्त आंदोलन स्थळी ठाण मांडून बसले आहेत.

### रोणापाल ग्रामस्थांचे ग्रामपंचायत विरोधात उपोषण

करणे, हायमास्ट बसविणे व ग्रामीण तीर्थक्षेत्रांना 'क' वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा देणे याविषयीचे प्रस्ताव ग्रामपंचायत प्रशासनाकडे मागण्यात आले. मात्र प्रशासनाने सहकार्य केले नाही. त्यामुळे रोणापाल ग्रामपंचायत प्रशासनाची सखोल चौकशी करून संबंधित कामांना होणारा अडसर दूर करावा. तसेच ग्रामपंचायत प्रशासनावर योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केल्याच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. तसेच देवी माऊलीला वंदन करून उपोषणास सुरुवात करणार असून यापुढे अन्यायाविरुद्ध लोकशाही मार्गाने लढा दिला जाईल असे प्रकाश गावडे यांनी सांगितले. दरम्यान ग्रामपंचायत प्रशासनाशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

### कसई – दोडामार्ग न.पं.च्या प्रारूप विकास आराखड्यात नेमकं दडलंय काय ?

नगरपंचायतने पत्रकारांना पत्रक काढून निमंत्रित केलं होत. मात्र बैठकीला गेल्यावर उपस्थित अधिकारी यांनी पत्रकार यांच्या सहभागाला आक्षेप घेतला. नगर रचना विभागाचे सहा. संचालक विद्याधर देसाई यांच्या सुचनेनुसार हा आक्षेप घेतल्याचे मागवून नगराध्यक्ष यांनी पत्रकारांना सांगितले. मात्र ज्या सभेला स्वतः नगराध्यक्ष यांनी पत्रकारांना निमंत्रित केले होते तिथे ती बाब नगराध्यक्ष यांनी उपस्थित अधिकारी यांचेकडे उघड करणे आवश्यक होते. मात्र तसे न झाल्याने पत्रकारांनी नगरपंचायत व नगराध्यक्ष यांच्या या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली. दोडामार्ग शहराच्या प्रारूप विकास आराखड्याला चर्चा करून मान्यता देण्याची जर ही सभा होती.तर शहर विकासाचे नियोजन पत्रकारांपासून एवढं लपविण्याची गरजच काय. त्या बाबत एवढी गुप्तता पाळण्याचे नेमके कारण तरी काय? नगररचना विभागाचे अधिकारी व नगरपंचायतचे पदाधिकारी यांच्यातच ही बैठक होती, तर मग पत्रकारांना निमंत्रणे का पाठविण्यात आली? असे सवाल उपस्थित होतो आहे.

### राजापूर येथे शिंपल्यांची तस्करी करणाऱ्या टेंपोसह चालक ताब्यात

टेम्पो येत असताना दिसला. या टेम्पोचा या पथकाला संशय आल्याने त्यांनी टेम्पो थांबविण्याचा इशारा केला व महामार्गाच्या एका बाजूला थांबवून टेम्पोच्या मागील हौदावर असलेली ताडपत्री वर करून पाहिली असता हौदामध्ये शिंपल्यांचा कच भरलेला दिसला. या पथकाने टेम्पोवरील चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव (दत्ता बाळासाहेब राऊत वय ४३ वर्षे रा. कागल बिरदेव वसाहत कागल, जि. कोल्हापूर) असे सांगितले व टेम्पो मधील मालाचे वजन १५ टन असल्याचे सांगितले. सदरच्या मालाबाबत टेम्पो चालकाकडे कोणताही खरेदी अगर वाहतुकीचा परवाना नसल्याने तो माल त्याने चोरुन आणल्याची खात्री या पथकाला झाली. या गुन्ह्यामधील आरोपी टेम्पो चालक दत्ता बाळासाहेब राऊत याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या विरुद्ध राजापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नं १४/२०२४ भा.द.वि. सं चे कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे व गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन आयशर टेम्पो क्रमांक (चक० ९-ऋङ-५११०) व १५ टन वजन असलेला खाडीतील शिंपल्यांचा कच हस्तगत करण्यात आला आहे.

### भ्रष्ट तलाठ्याला वैभव नाईक यांचा दणका ! तडकाफडकी बदली

वाळू व्यवसायिकांना देखील ते त्रास देत होते. स्थानिक कर्मचाऱ्यांवर देखील ते अरेरावी करत होते. सोनवणे यांच्याविरोधात ग्रामस्थांच्या तक्रारी असताना देखील त्यांची बदली केवळ वाळू पट्टा असलेल्या भागातच केली जात असल्याने याबाबत आमदार वैभव नाईक यांनी राज्य शासनाचे महसूल विभागाचे सचिव राजगोपाल देवरा यांच्याकडे तक्रार करून वाळू पट्टा नसलेल्या भागात किरण सोनवणे यांची बदली करण्यास सूचित केले होते. त्यानुसार किरण सोनवणे यांची गोठोस तलाठी सजा येथे तडकाफडकी बदली करण्यात आली आहे.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या आवाहनानुसार राज्यातील निवासी डॉक्टरांनी प्रस्तावित संप घेतला मागे

महाविद्यालयांमधील डॉक्टरांना पहिल्या दिवसापासूनच चांगल्या दर्जाची वसतिगृहे उपलब्ध होणार आहेत. अस्तित्वातील वसतिगृहांच्या दुरुस्तीसाठीचा निधी वितरित करण्यात आला आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या कामाला प्राधान्य देऊन तातडीने दुरुस्तीची कामे सुरु करावीत. त्यात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन झाल्यानंतर आज घेण्यात आलेल्या निर्णयांच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्यातील निवासी डॉक्टरांच्या वसतिगृहांची तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, वसतिगृहांच्या दुरुस्तीदरम्यान विद्यार्थ्यांना इतर ठिकाणी राहण्याची व्यवस्था करणे गरजेचे असते. मात्र, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या रुग्णालयांच्या परिसरात पर्यायी मोकळ्या खोल्या मिळण्यात अडचणी येतात. अशा वेळी गरजेच्या ठिकाणी विद्यार्थ्यांना भाड्याने खोल्या घेऊन राहता येण्यासाठी ठराविक भाडे देण्यात यावे. शक्य असेल त्याठिकाणी त्यांना पर्यायी खोल्या उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले.

**ग्रामपंचायत कार्यालय, आरोंदा** तालुका - सावंतवाडी, जिल्हा - सिंधुदुर्ग

जा.क्र. ८३५/२०२३-२४ — दिनांक : ०१/०२/२०२४

**जाहीर निविदा सूचना**

सरपंच ग्रामपंचायत आरोंदा, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग. यांजकडुन ग्रामपंचायत १४ वा वित्त आयोग व्याज रक्कम अंतर्गत खालीलप्रमाणे विकास कामासाठी नोंदणीकृत मक्तेदार यांचेकडुन बंद लखोटयात निविदा मागविण्यात येत असुन, खालील प्रमाणे काम ज्या नोंदणीकृत मक्तेदारास करावयाचे आहे. त्यांनी सुट्टीचे दिवस वगळुन कार्यालयीन वेळेत व दिनांक १३/०२/२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत आरोंदा ग्रा.पं. कार्यालयात निविदाचा अर्ज दाखल करावे.

कामाचा तपशिल

| अ.क्रं. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम रु. | टेंडर (निविदा) रक्कम | निविदा अर्ज फी | बयाना रक्कम | अनामत रक्कम | निविदा अर्ज स्विकारणेची अंतिम तारीख | निविदा उघडणेची तारीख | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १४ वा वित्त आयोग व्याज रक्कमेतुन स्ट्रीटलाईट पोलवर गाळे (१६) ओढणे व स्ट्रिटलाईट २ पोल बसविणे. | १,२६,०९६.३८ | ९२,९२२/- | २००/- | ९२९/- | ५% (करानाम्यावेळी १% व ४% बिलातुन कपात) | १३/०२/२०२४ | १४/०२/२०२४ रोजी स.११:००वा. (शक्य न झाल्यास ग्रा.प.सोईनुसार) | कार्यारंभ दिनांकापासुन अंदाजे ३ महिन्या पर्यंत |

निविदा सुचना बाबत अटी व शर्ती :


१. बयाना रक्कम भरल्याची चलन (सि.जि.म.स.बँक आरोंदा खाते क्र.०२७४०००००००१४५) / डी.डी. इत्यादी कागद पत्र सादर करणे आवश्यक. २. सदर कामासाठी निविदा अर्ज हे रु. २००/- फी भरुन खालील सही करणार यांचे कार्यालयात कार्यालयिन वेळेत उपलब्ध होतील. ३. ज्याचे नांवे निविदा, अर्ज मंजूर होईल त्यांना ग्रामपंचायतीकडे रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर रितसर करारनामा करुन दयावा लागेल; तसेच वेळेत करारनामा पुर्ण करुन न दिल्यास मक्तेदारास कामाची आवश्यकता नाही हे ग्रहित धरुन ग्रा.पं. पुढील निर्णय घेईल तो संबंधीतावर बंधन कारक राहील. ४. अतिरिक्त सुरक्षा अनामत व न्यूनतम देय्यकार (L2) बाबत कार्यवाही हि शासन परिपत्रक सा.बा. दि.२६/११/२०१८ नुसार राहील. ५. प्रत्येक मक्तेदाराने लिफाफा क्र. १ ( मागणी कागदपत्र) व लिफाफा क्र. २ (निविदा अर्ज दर) तसेच लिफाफा क्र. १ मध्ये शासन निर्णय क्र. सि ए टी / २०१८/प्र.क्र.१२७/इमा.२ सा.बा. दि.२८/११/२०१८ नुसार रु. १००/- च्या स्टॅप पेपरवर सत्य प्रतिज्ञा पत्र स्वत: सही करून जोडणे बंधनकारक. तरी अटीस अधिन राहून खाली सही करणारांकडे निविदा पाठवाव्यात.

सुचना - ग्रा.पं. कडुन वितरीत केलेल्या अर्जांबाबतच ग्रा.पं. विचार करेल याची समज घ्यावी.

सही/- ग्रामविकासअधिकारी
ग्रामपंचायत आरोंदा
ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग

सही/- सरपंच
ग्रामपंचायत आरोंदा
ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग

## थोडक्यात



### गुहागरात कासवाची १०८ पिल्ले समुद्राकडे झेपावली

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

कासव संवर्धनासाठी वन विभागाकडून सातत्याने प्रयत्न सुरू असून, गुहागर समुद्रकिनाऱ्यावर १०० घरटी संरक्षित करण्यात आली आहेत. या संरक्षित घरट्यांमधून गेल्या तीन दिवसात कासवांच्या १०८ पिल्लांना वन विभागामार्फत समुद्रात सोडण्यात आले.याबाबत वनपाल संतोष परशेटे यांनी सांगितले की, गुहागर बाग व गुहागर वरचापाट येथे समुद्रकिनारी सापडलेल्या ऑलिव्ह रिडले कासवांच्या १०० घरट्यांमधून १०,५३८ अंडी येथील कासव अंडी संरक्षण केंद्रामध्ये संरक्षित करण्यात आली आहेत. समुद्र किनारी १६ डिसेंबर २०२३ रोजी सापडलेल्या पहिल्या घरट्यातून ४ फेब्रुवारीला १, ५ फेब्रुवारीला ४ व ६ फेब्रुवारी १०३ अशी एकूण १०८ पिल्ले सुरक्षित समुद्रात सोडण्यात आली. मे महिन्यापर्यंत या घरट्यातून कासवांची अनेक पिल्ले टप्प्याटप्प्याने बाहेर पडत राहतील, असे वनपाल परशेट्ये यांनी सांगितले.

### सरमळे येथून बेपत्तो वृद्धेचा मृतदेह आढळले

**बांदा । वार्ताहर**


सरमळे येथून रविवारपासून बेपत्ता असलेल्या राधाबाई काशीराम माधव (८२) यांचा मृतदेह मंगळवारी दुपारी सरमळे दाभिल नदीपात्रात आढळला. सरपंच विजय अंकुश गावडे यांनी याबाबतची खबर बांदा पोलिसात दिली. सरमळे येथील राधाबाई रविवारपासून बेपत्ता होत्या. त्यांची मानसिक स्थिती खराब असल्याने त्या ओटवणे येथे आपल्या मुलीकडे गेल्या असण्याची शक्यता मुलाने वर्तविली होती. दरम्यान सरमळे येथे नदीपात्रालगत एका घराचे बांधकाम सुरू आहे. तेथील कामगार दुपारी नदीपात्रात गेले असता त्यांना नदीत मृतदेह असल्याचे निदर्शनास आले. तो मृतदेह राधाबाई माधव यांचा असल्याचे निष्पन्न झाले. माहिती मिळताच बांदा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस उपनिरीक्षक सुनील पडवळ, कॉन्स्टेबल तात्या कोळेकर, महिला पोलीस प्रियांका परब यांनी पंचनामा केला.



### माड्याचीवाडी येथे रेखी कार्यशाळा संपन्न

**कुडाळ । वार्ताहर**

माड्याचीवाडी कुडाळ येथे श्री सदगुरू भक्त सेवा न्यास संस्थेच्यावतीने एक दिवशीय रेखी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.या कार्यशाळेला श्री श्री १०८ महंत मठाधीश प.पूर्ण.सदगुरू गावडे काका महाराज,योग शिक्षक आनंद सावंत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी योग शिक्षक दिलीप सुतार,सौ.केसर वानीवडेकर, गिरीधर गावडे, प्रथमेश परब उपस्थित होते.



### भाजप ओबीसी महासंघ जिल्हा सरचिटणीस पदी बाळा आकेरकर

**ओरोस । वार्ताहर**

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा सिंधुदुर्ग जिल्हा कार्यकारणी घोषित करण्यात आली. बांदा माजी सरपंच बाळा आकेरकर यांच्या कामाची दखल घेत त्याची भाजप ओबीसी महासंघ जिल्हा सरचिटनिस पदी नियुक्ती करण्यात आली. जिल्हाध्यक्ष आनंद मेस्त्री यांनी त्याना नियुक्ती पत्र दिले.

# शिरगाव येथून माघवारी पायी दिंडीचे श्रीक्षेत्र पंढरपूर कडे प्रस्थान

**शिरगाव । पांडूशेठ साटम**

टाळ मृदुंगाच्या गजरात व विठ्ठलनामाच्या अखंड जयघोषात देवगड तालुक्यातील शिरगाव वारकरी संप्रदायाची माघवारी पायी दिंडीने बुधवारी सकाळी शिरगाव बाजारपेठ येथील श्री हनुमान मंदिर येथून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान केले. यावेळी शिरगाव गावचे ग्रामदैवत श्री पावणाई देवीच्या देवालयात श्रीफळ ठेवून माघवारी पायी दिंडीचा शुभारंभ करण्यात आला. सकाळी बाजारपेठेतील श्री हनुमान मंदिरात शिरगाव दशक्रोशीतील वारकरी, ग्रामस्थ, विविध क्षेत्रांतील मान्यवर एकत्र येऊन हरीपाठ व आरतीचा कार्यक्रम पार पडला. हनुमान मंदिरास प्रदक्षिणा पुर्ण झाल्यानंतर म ाघवारी पायी दिंडीचे शिरगाव येथून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान झाले. यावेळी सुहासिनीनी वारकरी माऊलींचे औक्षण करून शुभेच्छा दिल्या. यानंतर दिंडी शिरगाव बसस्थानकासमोर आल्यानंतर दिंडी चालली.. चालली.. चालली.. पंढरपुरा.,हरी मुखे म्हणा.. हरी मुखे म्हणा , सुंदर ते उभे विठेवरी, या सारखे वारकरी अभंग गात विठूनामाच्या जयघोषात रिंगण केले. दिंडीत सहभागी झालेल्या वारकरी माऊलींना शुभेच्छा देण्यासाठी क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. विठ्ठलनामाच्या गजरात पहाटेपासूनच शिरगावनगरी दुमदुमून निघाली होती. या दिंडीने शिरगाव ओम गणेशमंदिर, आंबेखोल येथील शिवाजी चौक, श्री स्वामी समर्थमठ, विठ्ठल मंदिर येथे आरती करून दुपारी नांदगाव येथील प्रमोद लोके यांच्या निवासस्थानी महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर दिंडीने कणकवली तालुक्यातील लोरे नं. १ कडे प्रस्थान केले. या दिंडीतून वारकरी संप्रदायाचा प्रसार व्हावा.तसेच यामुळे सामाजिक सलोखा निर्माण होऊन ऐकमेकांबद्दल आदरभाव वाढीस लागेल. असे मत माघवारी पायी दिंडीप्रमुख ह भ प सर्वोत्तम साटम महाराज यांनी यावेळी सांगितले.



## पटवर्धन चौकातील बॅरिकेट्स देतायत अपघाताला निमंत्रण : प्रमोद मसुरकर

**कणकवली । प्रतिनिधी**

कणकवली शहरातील पटवर्धन चौकात वाहतूक पोलिसांकडून लावण्यात आलेले बॅरिकेट्स हे अपघाताला निमंत्रण देत असून याकडे कणकवली पोलीस प्रशासन कानाडोळा करत असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे कणकवली शहर प्रमुख प्रमोदशेठ मसुरकर यांनी केला आहे. याबाबत प्रमोदशेठ मसुरकर यांनी म्हटले आहे की पटवर्धन चौक हा कायम रहदारी आणि वाहतुकीने गजबजलेला असतो. मात्र शहरात कोठेही नसणारे बॅरिकेट्स केवळ पटवर्धन चौकात लावण्यात आले आहेत. हे बॅरिकेट्स अधिकृत असतील तर जेव्हा एखादा धार्मिक, सामाजिक, अथवा राजकीय कार्यक्रम पटवर्धन चौकात घेतला जातो तेव्हा ते का



हटवले जातात ? आणि जर ते बॅरिकेट्स अनधिकृत असतील तर वाहतूक पोलिसांसमक्ष कसे लावलेले असतात ? असा सवालही मसुरकर यांनी केला आहे. बॅरिकेट्स मुळे कंटेनर सारखे एखादे अवजड वाहन आले तर पादचारी अथवा वाहनचालकांचा अपघातसुद्धा याच बॅरिकेट्स मुळे होण्याचा धोका संभवतो. याची तात्काळ दखल घेत जर हे अनधिकृत बॅरिकेट्स असतील तर तात्काळ हटवावेत अन्यथा शिवसेना शहरप्रमुख म्हणून आंदोलन करण्याचा इशारा प्रमोदशेठ मसुरकर यांनी दिला आहे.

## पिंगुळी मध्ये परप्रांतीयांच्या विरोधात स्थानिक व्यापारी व कारागीर एकवटले

**कुडाळ । प्रतिनिधी**

पिंगुळी मध्ये सध्या स्थितीत सुरू होत असलेल्या नवीन परप्रांतीय यांचे कृष्णाई हार्डवेअर या दुकानांमध्ये चालू असलेला होलसेल विक्री हार्डवेअर यांच्या विरोधात त्या ठिकाणचे स्थानिक व्यावसायिक व कारागीर यांनी ग्रामपंचायत व पिंगुळी व्यापारी संघटना यांना त्यांच्या विरोधात पत्र दिले यावेळी प्रसाद गावडे, अजित मार्गी, श्री ग्लास चे मालक उमेश ठाकूर, सिद्धेश नाईक, तुळशीदास पटेल, रामचंद्र गावडे,



किरण गावडे धोंडी कांबळी, निखिल वेंगुर्लेकर, आधी सगळे उपस्थित होते. या होलसेल विक्री दुकानासाठी कुडाळ नगरपंचायतने परमिशन दिली नाही त्यामुळे यांनी ग्रामीण भागामध्ये दुकान घातले आहे प्रत्येक वेळी ग्रामीण भागात असलेल्या स्थानिक व्यापारी व कारागीर यांच्यावर हे सर्व लादले जाते या दुकानांमध्ये काम करत असलेले सर्व कारागीर हे परप्रांतीय आहेत परप्रांतीय कारागिराने जर या ग्रामीण भागात येऊन काम चालू केली तर त्याचा परिणाम पुढील काळात या व्यापारी व स्थानिक कारागिरी यांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. याचा विचार तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर व्यापारी संघटनेने करावा यातून काहीतरी तोडगा काढण्यात यावा अशी सर्व व्यापारी व स्थानिक कारागीर यांची मागणी आहे

## नांदगाव येथे महामार्गाच्या भूसंपादन मोजणीला नागरिकांचा विरोध

**नांदगाव । वार्ताहर**

मुंबई- गोवा महामार्गासाठी भूसंपादनाच्या मोजणीला नांदगाव तिठ्ठा (ता.कणकवली) येथे स्थानिक नागरिकांनी विरोध केला. त्यामुळे हायवे प्राधिकरण आणि भूमी अभिलेखचे कर्मचारी मोजणी न करता माघारी परतले. सर्वांना नोटीसा का बजावली नाही. यामुळे अर्धवट मोजणी आम्हाला मान्य नाही, अशी भूमिका यावेळी नागरिकांनी घेतली. यावेळी नांदगावचे सरपंच भाई मोरजकर, माजी जि.प. सभापती नागेश मोरये, उपसरपंच इरफान साटविलकर, चंदू खोत, हायवे प्राधिकरण उपअभियंता कुमावत व भूमी अभिलेखचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.



सरपंच भाई मोरजकर म्हणाले की, नांदगाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून भूसंपादनाच्या प्रश्नाबाबत ९ नोव्हेंबर २०२३ रोजी नांदगाव तिठ्ठा ब्रिजखाली आमरण उपोषण केले होते. नांदगाव पावाचीवाडी ते नांदगाव तिठ्ठा महामार्गाच्या दुतर्फा हद्द कायम करून मिळावी, अशी ग्रामस्थांची मागणी होती. महामार्गालगत असलेली शेतकऱ्यांची जमीन संपादनात किती गेली. व आता किती शिल्लक आहे, हे समजेल, अशी मागणी ग्रामस्थांनी केली होती. यावर मोजणी करून जागा ताब्यात देण्याचे आश्वासन महामार्ग प्राधिकरणाने दिले होते. त्या अनुषंगाने आज (दि. ५) आणि उद्या (दि. ६) दोन दिवस मोजणी होणार होती. परंतु त्यामध्ये अपेक्षित सर्वे नंबर, गट नंबर यांचा समावेश नव्हता. प्राधिकरणाकडून असा भोंगळ कारभार केल्याने ग्रामस्थांची तसेच ग्रामपंचायतची दिशाभूल झाली आहे. जोपर्यंत ठोस लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत मोजणी करू देणार नाही, तसेच खारेपाटण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा सरपंच मोरजकर यांनी यावेळी दिला. बेळणे, नांदगाव, असलदे येथील महामार्गाची हद्द कायम करण्यासाठी शेतकरी व नागरिकांना विश्वासात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व शेतक-यांना नोटीस देणे बंधनकारक आहे. तरी यापुढे महामार्ग प्राधिकरण, भूमि अभिलेखने सर्व कायदेशीर नोटीस बजावून हद्द कायम करावी. अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्या संगनमताने कामे झाली असून यात भष्टाचार झाला आहे.

## फलक पुन्हा न लावल्यास आंदोलन-रुपेश राऊळ सावंतवाडी पालिका प्रशासनास इशारा

**केसरकरांना जनता जागा दाखवेल**

**तालुक्यात ५२ ग्रामपंचायतींची निवडणूक झाली. त्यात एक तरी ग्रामपंचायत शिंदे गटाची निवडून आली का० याचा केसरकरांनी विचार करावा आणि नंतरच आमच्या नेत्यांवर बोलावे. केसरकर खोटे बोलून येथील जनतेची दिशाभूल करीत आहेत, हे आता येथील जनतेच्या लक्षात आले आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्यांना जनता त्यांची जागा दाखवून देईल, असे यावेळी श्री. राऊळ यांनी सांगितले.**

**सावंतवाडी । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर स्वागताचे लावलेले फलक मुदत असताना येथील पालिका प्रशासनाने काढले आहेत. मात्र, ते उद्यापर्यंत (ता.५) न लागल्यास येथील पालिकेसमोर सावंतवाडीतील शिवसैनिकांना घेऊन आंदोलन करू, असा इशारा आज येथे शिवसेना ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख रुपेश राऊळ यांनी आज दिला.

उद्धव ठाकरे कृतघ्न, शिवसेनेनेमुळे मी आमदार झालो नाही, माझी मते स्वतःची आहेत, असे विधान करणारे दीपक केसरकर म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा असा प्रकार आहे. शिवसेना पदाधिकाऱ्यांनी दिवस-रात्र काम केल्यामुळेच ते आमदार झाले. आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीत त्यांनी उमेदवार अर्ज भरावाच. सावंतवाडीची जनता त्यांना योग्य ती जागा दाखवून देईल, असाही टोला त्यांनी यावेळी लगावला. श्री. राऊळ यांनी आज येथील कार्यालयात पत्रकार परिषद घेतली. तत्पूर्वी त्यांनी पालिकेचे मुख्याधिकारी सागर साळुंखे यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी शहर प्रमुख शैलेश गवंडळकर, अशोक परब, आबा सावंत, प्रशांत भोगटे, फिलीप रोड्रिक्स, सुनील गावडे, संदेश केरकर आदी उपस्थित होते. श्री. राऊळ म्हणाले, ''पक्षप्रमुख ठाकरे यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सावंतवाडी शिवसेना पदाधिकाऱ्यांकडून स्वागताचे फलक लावले होते. त्यासाठी आवश्यक मंजुरी व शुल्क भरले होते. आजपर्यंत त्याचा कालावधी होता; परंतु, काही लोकांच्या दबावाखातर पालिका प्रशासनाने हे फलक काढून टाकले. हा प्रकार योग्य नाही. केवळ शिवसेनेला डावलण्यासाठी अधिकाऱ्यांकडून पोटदुखीचा प्रकार सुरू आहे. त्यामागे कोणाचा तरी हात आहे. आमचे शहर प्रमुख गवंडळकर यांना रात्री ११ वाजण्याच्या सुमारास पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांचा फोन आला होता. त्यांनी बॅनर काढा, अशा आम्हाला सूचना केल्या होत्या. त्यानुसार आम्ही त्यांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, रातोरात बॅनर काढण्यात आले. त्या ठिकाणी बॅनर गायब झाल्याचे लक्षात आल्यानंतर आम्ही मुख्याधिकारी साळुंखे यांची भेट घेतली. यावेळी शासनाचा कार्यक्रम असल्यामुळे बॅनर काढले असल्याचे त्यांनी सांगितले. परंतु, आम्ही मंजुरी व फीची रक्कम भरली होती, असे सांगितल्यानंतर त्यांनी माफी मागितली व बॅनर पुन्हा लावू, असे सांगितले आहे. हा सर्व प्रकार चुकीचा आहे. त्यामुळे या प्रकारामध्ये कोणाचा तरी हात आहे. उद्यापर्यंत बॅनर न लागल्यास तीव्र आंदोलन केले जाईल.''

यावेळी श्री. ठाकरे व शिवसेनेवर आरोप करणाऱ्या केसरकर यांचाही श्री. राऊळ यांनी समाचार घेतला. ते म्हणाले, ''केसरकर आमदार होण्यामागे येथील शिवसेना पदाधिकाऱ्यांचा आणि जनतेचा फार मोठा वाटा आहे. सर्व शिवसैनिकांनी त्यावेळी रात्रंदिवस काम करून यांना आमदार केले होते. त्यामुळे केसरकर हे शिवसेनेच्या जीवावरच मोठे झाले आहेत. त्यांना मंत्रीपद याच ठिकाणी मिळाले. परंतु, असे असताना ते जर श्री. ठाकरेंवर टीका करत असतील तर आम्ही जास्त काही बोलणार नाही. जनतेच्या न्यायालयात त्यांना योग्य ती जागा शिवसैनिक दाखवून देतील. आगामी काळात होणाऱ्या निवडणुका दूर नाहीत. त्यामुळे त्यावेळी त्यांना त्यांची खरी ताकद कळेल. त्यांनी उमेदवारी अर्ज भरावा आणि आपले नशीब आजमावावे. त्यावेळी कोण सरस हे नक्कीच ठरेल.

## आवळेगाव मध्ये आ.वैभव नाईक यांच्या माध्यमातून ५७ लाखाच्या विकास कामांचे भूमिपूजन

**आवळेगाव । वार्ताहर**

आवळेगाव या गावात आमदार वैभव नाईक यांच्या माध्यमातून तब्बल ५७ लाख रुपयाची विकासकामे मंजूर करण्यात आली असून या विकासकामांचे भूमिपूजने आ. वैभव नाईक यांच्या उपस्थितीत करण्यात आली. त्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले. यामध्ये बजेट २०२२-२३ अंतर्गत आवळेगाव कुंभारवाडी ग्रा. मा. १३३ डांबरीकरण करणे निधी १९ लाख रु. आणि आवळेगाव टेंबवाडी, दाबटेवाडी ग्रा. मा.



१३२ डांबरीकरण करणे निधी २८ लाख रु. आमदार फंडातून आवळेगाव मधलीवाडी जाणारा रस्ता डांबरीकरण करणे निधी ५ लाख आणि आवळेगाव भटवाडी जाणारा रस्ता डांबरीकरण करणे ५ लाख रु. या कामांची भूमिपूजने करण्यात आली. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख अमरसेन सावंत, कुडाळ तालुका संघटक बबन बोबाटे, उपतालुकाप्रमुख बाळा कोरगावकर, उपतालुकाप्रमुख सचिन कदम, विभाग प्रमुख नरेंद्र राणे, विभाग संघटक संदीप सावंत, आवळेगाव उपसरपंच विवेक कुपेरकर, माजी सरपंच सुनील सावंत, शाखा प्रमुख नितीन सावंत, ग्रा.प.सदस्य अमोल सावंत, राजाराम सावंत, निवृत्ती सावंत, दिनेश परब, पांडुरंग कासार, गुरू मुंज, विद्या मुंज, राजू मुंज,विष्णू तीळवे, सतीश तीळवे, विजय पवार आदी शिवसैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## कारच्या धडकेत ओरोस आरटीओ विभागाचा कर्मचारी ठार

**कुडाळ । वार्ताहर**

भरधाव जाणाऱ्या कारने धडक दिल्यामुळे ओरोस येथील आरटीओ ऑफिसचे कर्मचारी जागीच ठार झाले. कालिदास झणझणे मुळ रा. सातारा (सध्या राहणार ओरोस) असे त्यांचे नाव आहे. हा अपघात आज सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास हुमरमळा येथे घडला. याबाबत अधिक माहिती अशी की, श्री झणझणे हे



सकाळी आज नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉक साठी केले होते. यावेळी मागून भरधाव वेगाने आलेल्या एका कारने त्यांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जबरदस्त होती की यात ते तब्बल ५० फूट अंतरावर जाऊन कोसळले डोक्याला गंभीर दुखावत झाली असल्या मुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी ग्रामस्थानी धाव घेतली. पोलिसांना प्राचारण करण्यात आले परंतु तत्पूर्वी त्यांचा मृत्यू झाला.अपघात करणाऱ्या संबंधित कारचालकाला ग्रामस्थांनी अडवले असून त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# रत्नागिरीच्या युवकांने वाचवले १९ लोकांचे प्राण !

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

मुंबई- गोवा महामार्गावर चालत्या लक्झरी बसने पेट घेतला. सुदैवाने मोठा अनर्थ टळला आहे. हा सगळा अनर्थ बस चालकाच्या प्रसंगावधानामुळे नाही तर बसमधून प्रवास करत असलेल्या एका युवकाच्या प्रसंगावधानामुळे अनर्थ टळल्याची माहिती समोर आली आहे. सगळे प्रवासी गाढ झोपेत असताना चालत्या बसने पेट घेतला. मात्र, हा सगळा प्रकार बसमधून प्रवास करत असलेल्या रत्नागिरी येथील आर्यन नामक युवकाच्या लक्षात आल्याने बसमधील एकूण २१ प्रवाशांचे प्राण वाचले आहेत.

अक्षय भाटकर यांच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला आहे. मुंबई - गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्यात महाड येथे सावित्री पुलाजवळ हा सगळा प्रसंग घडला. गुल हसन हबीबरुला पठाण असं या बस चालकाचं नाव आहे. ज्या युवकाने या सगळ्या प्रवाशांना वाचवले तो युवक आर्यन भाटकर हा मूळचा रत्नागिरी मिर्या येथील आहे. ही दुर्घटना घडली त्यावेळी या बसमध्ये १९ प्रवासी तसेच बस चालक व दोन क्लिनर असे एकूण २१ जण होते. या सगळ्या दुर्घटनेत आकांक्षा व आर्यन या दोन्ही बहीण भावाने सगळ्या प्रवाशांना



जागे करून खाली उतरवले म्हणून मोठा अनर्थ टळला. काल मंगळवारी मध्यरात्री दोन वाजताच्या दरम्यान मुंबई - गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राजेवाडी फाट्याजवळ औदुंबर ट्रॅव्हल्सची लक्झरी बस जळून खाक झाल्याची घटना घडली. औदुंबर ट्रॅव्हल्सची चक ०८ ९७७९ क्रमांकाची लक्झरी बस रत्नागिरीवरुन मुंबई येथे निघाली होती. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाड तालुक्यातील राजेवाडी फाट्याजवळ बस आली असता बसचा टायर गरम होऊन फुटल्याने आग लागल्याचे चालक गुलशन पठाण यांच्या लक्षात येताच त्यांनी लक्झरी बस रस्त्याच्या साईडला घेतली. हा प्रकार गंभीर असल्याचे लक्षात येतात आर्यनने बस मध्ये आपली बहीण आकांक्षा हिलाही उठवले. टायरला आधी छोट्या प्रमाणात आग लागली नंतर ही आग वाढत गेली. या दरम्यान काही क्षणाचा विलंबना न करता या युवकाने व त्याची बहीण आकांक्षा हीने सगळ्या प्रवाशांना उठवले म्हणून मोठा अनर्थ टळला. आर्यन व आकांक्षा या दोघांनी इतर प्रवाशांना जागे करून उठवले व बसमधून खाली उतरवले तसेच आर्यन यानेच आपल्या मोबाईलवरुन पोलीस व फायर ब्रिगेडला फोन केला. काही मिनिटातच अवघ्या बसने पेट घेतला अशी प्रतिक्रिया आर्यन भाटकर यांनी बोलताना दिली आहे. आर्यन हा मुंबई दादर येथे आयसीएस हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयाचा विद्यार्थी असून आकांक्षा ही रुपारेल महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. या सगळ्या दुर्घटनेत काही प्रवाशांचे सामान जळून खाक झाले असून आर्यन व आकांक्षा यांची बॅग या आगीत जळून भस्मसात झाली. या सगळ्या प्रसंगात रत्नागिरीचा आर्यन व आकांक्षा या दोघांनी दाखवलेल्या प्रसंगावधानाचं कौतूक होत आहे. तसेच या बॅगेत सोबत असणारे महाविद्यालयात लागणारी फीसाठी घेऊन जात असलेली एक लाखाची रोकडही या आगीत भस्मसात झाल्याची माहिती आर्यन भाटकर याने दिली. या दुर्घटनेत बसमध्ये दोन चालकांसह २१ प्रवासी प्रवास करीत होते. सुदैवाने लक्झरी बसमधील सर्व प्रवासी बचावले आहेत. घटनास्थळी महाड एमआयडीसी अग्निशमन दलाच्या गाड्या पोहोचेपर्यंत आगीत लक्झरी बस पूर्णतः जळून खाक झाली होती. या संपूर्ण घटनेचा अधिक तपास महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार श्री.राठोड करत आहेत.